# मैफल गझलांची

इंद्र पवार



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६७५

REFBK-0026258
REFBK-0026258

संदर्भ
काव्य
२६१५
२६२५८
२५।१२।९०

२६१५
२६२५८
काव्य २५।१२।९०

सूच
तसे
जा

# मैफल गझलांची



इन्द्र पवार

REFBK-0026258
REFBK-0026258

अमृतदीप प्रकाशन
'शांतिनिकेतन'
बेगमपुरा, औरंगाबाद-४.
(महाराष्ट्र)

अमृतदीप प्रकाशन, औरंगाबाद (महा.)



● प्रकाशक :

सौ. शचीदेवी इन्द्र पवार
अमृत दीप प्रकाशन
'शांतिनिकेतन',
गुरुदत्तनगर, बेगमपुरा,
औरंगाबाद–४३१ ००४.

● मुद्रक :

पं. बं. शेळके
नाथ मुद्रणालय,
शारदा कॉलनी, पैठणगेट,
औरंगाबाद–४३१ ००१.
(महाराष्ट्र)

© डॉ. इन्द्र पवार

● मूल्य : बीस रुपये

२६१५
क्र. २६२५८
२५।१२।६०

## दाद...

का कोण जाणे, पण अगदी परवा परवापर्यंत 'गझल' हा काव्य प्रकार मराठी मनाला फारसा भावत नव्हता. कसल्याही बऱ्या-वाईट नाटकाला यथायोग्य पण उत्स्फूर्त दाद देणारा मराठी माणूस, गझलाच्या अगर शेरोशायरीच्या मैफलीत मात्र संकोचल्या मनानं आणि अवघडत्या शरीरानंच बसत होता. 'आपण चुकून या जागी आलो आहोत' हा भाव त्याच्या चेहऱ्या-वर उमटल्याशिवाय राहात नव्हता. थोडक्यात 'गझल' हा मराठी मनाला परकीय वाटत आली होती. कविवर्य माधव ज्युलियन यांच्या 'गज्जलांजली'नेही मराठी रसिकांना फारसे आकर्षित केले नव्हते, ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही.

पण गेल्या काही दिवसात मात्र ही परिस्थिती झपाट्यानं पालटत आहे. मंगेश पाडगावकर, सुरेश भट, पाटणकर यांच्या-सारख्या प्रतिभासंपन्न मराठी कवींनी खास मराठी शैलीत आणि मराठी भाषेतच 'गझल' हा काव्य प्रकार सादर केला आणि हा प्रकार फारसा परका नाही आणि अनाकलनीय तर नाहीच नाही, याची मराठी रसिकांना जाणीव झाली. आणि आता तर मराठी कविसंमेलनातून गझल गीतांना मिळणारी उदंड दाद पाहता हा प्रकार मराठीनें पूर्णपणे आतमसात केली आहे, यात शंकाच वाटेनाशी होते.

गझल गीतांना ही लोकप्रियता मिळवून देणाऱ्या मराठी कवींत प्रा. इंद्रराव पवार यांचा वाटा निःसंशय मोठा आहे. आजवर अनेक लहान–मोठ्या मैफलीतून रसिकांकडून दाद घेणाऱ्या त्यांच्या गझला आज पुस्तकरूपानं वाचकांसमोर येत आहेत.

जरा बारकाईनं विचार केला तर असं ध्यानात येईल की, गझल या काव्यप्रकाराचे बहिरंग परके असले तरी, त्याचे अंतरंग खासच परके नाही.

गझलमधला 'शेर' हा आपल्याकडील 'सुभाषिताशी' खूपच जुळता मिळता आहे. 'शेर' म्हटल्यावर जीवनामधली एखादी उत्कट अनुभूती नाट्यपूर्ण अशा दोन ओळींमधून आपल्यासमोर साकार होते, तीच गोष्ट आपल्याकडील सुभाषितातूनही घडते. एकदा असाच उत्कट विचार अगर जीवनानुभव चमकदार आणि चमत्कृतीपूर्ण कल्पनेचा आधार घेत सुभाषितातून मोठ्या प्रभावीपणे मांडलेला आढळतो. सहज आठवणारे एक संस्कृत सुभाषित उदाहरणादाखल सांगण्यासारखे आहे. सुभाषितकार म्हणतो-

आशानाम मनुष्यानां शृंखला काचिदद्‌भुता ।
ययाबद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत् ।।

म्हणजे, आशा नावाची बेडी मोठी अद्‌भुत असते. या बेडीने जखडलेली माणसे बेभान होऊन पळत सुटतात, तर ही बेडी तुटली की माणसे एके जागी स्वस्थ बसतात. आता या कल्पनेतील विरोधाभास आणि मूळ आशयाची नाट्यपूर्ण मांडणी 'वाः क्या बात है' म्हणून दाद देण्यासारखी नाही काय?

पण आपल्याकडे अशी मोकळेपणानं दाद देण्याची चालच एकूण कमी. पण गझल आणि त्यातील अंगभूत 'शेर' याचा पेश

करण्याचा एकूण डौल यांनी आपल्याला 'दाद' देण्याची सवय लावली, हे कबूल केले पाहिजे. 'वा' म्हणण्याच्या बाबतीत आपला कंठ अधिक मोकळा झाला. याच मोकळेपणानं प्रा. इंद्रराव पवार यांच्या प्रस्तुत मैफलीला मनसोक्त दाद द्यावीशी वाटते.

'उत्कटता' हा तर कुठल्याही चांगल्या काव्याप्रमाणेच 'गझल'चा प्राण. हा प्राणच जिथं नसतो, तिथं असते ती शब्दांची निर्जीव जुळवाजुळव. अशा निर्जीव, कृत्रिम आणि म्हणूनच कागदी फुलांप्रमाण बटबटीत वाटणाऱ्या आजच्या गझलांच्या निर्गंध गर्दीत प्रा. इंद्रराव यांची रसरशीत आणि सुगंधी गझल, उठून दिसते. रसिक मनाला विलक्षण सुखावून जाते.

मानवी मनोव्यापारातील आणि जीवन व्यवहारातील अनेक छटा, इंद्रराव यांच्या लेखणीनं संवेदनशील वृत्तीनं टिपून, त्या अत्यंत कलात्मकतेनं या मैफलीत सादर केल्या आहेत. म्हणूनच त्यांच्या गझलगीतांतून कधी 'सतारीच्या तारांमधून नवा झंकार' थरारल्याचा अनुभव येतो. तर कधी 'कळ्या-कळ्या मोकळ्या होऊन हसत असल्याचा' भास होतो.

कविराज इंद्रराव यांनी जीवनामधली 'पानगळ' आणि 'वसंत बहार' सारख्याच रसिकतेनं उपभोगल्या असल्याच्या खुणा तर त्यांच्या अनेक गझलांतून दिसतात. 'वेगळी माझी वाट' ही तर त्यांच्या उत्कटतेनं जीवन जगण्याची ऊर्मीच. म्हणूनच या वेगळ्या वाटेवरून धुंदपणे प्रवास करताना प्रसंगी जो 'वनवास' वाट्याला येतो, त्या वनवासातील रमणीयतेचा प्रत्ययही त्यांनी रसिकांना घडविला आहे.

आर्तता किंवा दर्द हा गझल गीतांतील आणखी एक लक्षणीय विशेष. 'मैफलीती'ल अनेक गझलांतून ही आर्तता विविध अंगांनी आणि विविध रंगांनी व्यक्त झाली आहे.

किंबहुना 'दर्दिल्या मम गझलात' त्यांनीच म्हटल्याप्रमाणं, दर्दील्या अनुभवातच त्यांचे कविमन भिजत आहे. याचा पदोपदी रसिकांना प्रत्यय येतो.

या आर्त अनुभवांना कधी सामाजिक आशय प्राप्त होऊन त्यातूनच 'दलितांची गझल' निर्माण होते तर कधी ते अनुभव मशालीचं रूप धारण करून सामाजिक दंभांना त्यांची गझल उपहासाचे दाहक चटके देतांना दिसते.

थोडक्यात, प्रा. इंद्रराव पवार यांची गझल मराठीतील ही खरीखुरी 'आजची गझल' आहे. त्यांच्या अभिजात रसील्या वृत्तीतून अलगद उमलेली ही मुलायम गझल पहा—

'पाहतो गुलाबकळ्या हळुहळू उमलतांना
परि सर ना तयांना सखी अधर हसतांना!

ही गझल बसल्याजागी वाचतांना तर आपण साक्षात मैफलीत बसल्याचा भास होऊन रसिकाला 'वा: भाई वा.' अशी प्रकट स्वरात दाद द्यावीशी वाटली तर त्यात काय नवल?

**प्रा. वसंत कुंभोजकर**

# मराठी गझलची सरगम

'मैफल गझलांची' हा माझा गझल-संग्रह रसिक वाचकांच्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. आधुनिक मराठी काव्यात अलीकडे गझल लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर आरूढ होऊन मराठी काव्यक्षेत्रात चांगलीच रूढ झाली आहे. अनेक नव-कवी गझल लेखन करण्यात आपल्या कविता लेखनाची सार्थकता, धन्यता समजतात. नव्या पिढीतले नवकवी गझल लिहिण्यात भूषण मानतात. आणि काव्यप्रेमी सुजाण नि सुहृदय मराठी रसिकांची मराठी गझलेला काव्यमैफलीत चांगलीच दिलखुलास दाद मिळते आहे. मराठी साप्ताहिकं, मासिकं अन् काही पुस्तकांतून 'गझल' काव्यप्रकाराचं विवेचन करणारं लेखन अलीकडे झळकू लागलं आहे. अशावेळी एकंदर 'गझल' काव्यप्रकार आणि मराठी गझलेसंबंधी 'मला काही सांगायचंय्', असं आम्ही म्हटलं तर ते वावगं ठरू नये, अप्रस्तुत वाटू नये, म्हणून काही ओळींचा हा आमचा लेखन-प्रपंच.

आजकाल मराठी काव्यसंभारात विपुल गझल लेखन अन् गझलेला मिळणारी उत्स्फूर्त उदंड दाद बघून मराठी गझलेच्या गुलशनवर शिगोशिग नव वसंतबहार मोहरून आलाय, फळं-फुलं भरभरून मोहरून आलीय, असं विधान केल्यास अनुचित वाटू नये. मराठी गझलेला आता चांगले दिवस आले आहेत.पण गझल काव्य-प्रकाराविषयी, तिच्या शास्त्रशुद्ध तंत्रमंत्राविषयी माहिती फारच थोड्या लोकांना असते, अशी साधार शंका आम्हास वाटते. म्हणून मराठी काव्यमर्मज्ञ काव्यरसिकांची मराठी गझलेसंबंधी सुजाण

जाण असावी, वाढीस लागावी, त्या सद्हेतूनं आम्ही काही ओळी आपल्या सेवेशी नम्रपणे सादर करीत आहोत.

आधुनिक मराठी काव्यक्षेत्रात हल्ली गझलसदृश (गझलनुमा) रचना 'गाजर गवताऐसी उदंड' अन् विशुद्ध गझल अल्प प्रमाणात आढळून येते. यावर असा प्रश्न निर्माण होतो की, गझलसदृश (गझलनुमा) रचनेला शास्त्रशुद्ध विशुद्ध गझलेचे नियम निकष संपूर्णपणे लावता येतील काय, लावावेत काय? आणि अशी गोष्ट करणे, आज मराठी गझलेच्या निकोप वाढीसाठी समुचित ठरेल काय? गझलेच्या शास्त्र व तंत्रमंत्राचे संपूर्ण निकष लावून आजच्या मराठी गझलांची समालोचना केली, तर आपले सुमारे ९५ टक्के गझलकार बाद ठरतील, म्हणून असल्या गझलसदृश (गझलनुमा) रचनेला 'गझलाभास' म्हणावे काय? असे मूलगामी प्रश्न मराठी गझलेच्या संदर्भात विचारता येण्यासारखे आहेत.

तसेच, गझल वृत्त की, वृत्तो? हा चावून चोथा झालेला प्रश्नही चर्चेला घेता येण्यासारखा आहे. या यक्ष प्रश्नांची उत्तरं आम्ही नंतर देणार आहोतच, पण त्या आधी वर उल्लेखिलेल्या काही प्रश्नांचा खुलासा करणं इष्ट ठरेल.

तथाकथित गझलसदृश (गझलनुमा) रचना व विशुद्ध शास्त्रशुद्ध गझल असा फरक न करता सगळ्या रचनांना 'मराठी गझल' नामाभिधान द्यावं, अशी माझी स्वतःची सर्वसमावेशक भूमिका आहे. त्यामुळे मराठी गझलेचा आणि पर्यायाने आधुनिक मराठी कवितेचा विकास अबाधपणे व निर्विघ्नपणे होऊ शकेल संस्कृतिसंरक्षक म्हणवून घेणाऱ्या मराठी गझलेच्या अनुशासनप्रिय कठोर 'पाणिनि' महानुभावांनी मराठी गझलेच्या निरंतर विकासाला नख लावता कामा नये. संस्कृतिसंरक्षणाचा गगनभेदी गिल्ला व हंगामा करून मराठी गझलेच्या विकासावर हल्ला चढविणाऱ्या मराठी

गझलेच्या कुलिशकठोर निर्दय टीकाकारांना उर्दू शायरांच्या शब्दात ठणकावून सांगावसं वाटतं–

" रफीकों से रकीब अच्छे जो जलकर नाम लेते हैं ।
गुलों से खार अच्छे जो दामन थाम लेते हैं ॥ "

'गझल' हा मूळ अरबी शब्द, पण अरबी भाषेत विशेष गझल रचना नाही. 'गझल' हा काव्यप्रकार फारशी वाङ्मयातून उर्दू, हिंदी गुजराती आणि मराठी भाषांमध्ये अवतरला. आज तुर्की, पंजाबी, सिंधी, बंगाली, पश्तो, हिन्दी आणि हिंदीच्याच उपभाषा असलेल्या अवधी ब्रज आणि भोजपुरीमध्येदेखील गझला लिहिल्या जाताहेत. सुमारे गेल्या ६०–७५ वर्षांपासून गुजराती साहित्यात गझल आपल्या गुजराती भाषेच्या अंगी असलेल्या लालित्यपूर्ण लावण्यानं काव्यरसिकांना भुरळ व मोहिनी घालून आहे. आणि आता मराठीत जरा उशीरा का होईना, पण गझलेचा ललित कोमल रुणझुण नादमधुर पदविन्यास झालाय, हे निर्विवाद. अशा वेळी ललित कोमलांगी लीलावती लावण्यवती मराठी गझलेचं सहर्ष 'सुस्वागत' करून म्हणावसं वाटतं–

' देर आयद दुरूस्त आयद ! खैरमकदम, सुस्वागतम् ! ! '

## गझलची परिभाषा

आम्ही वर म्हटलंच आहे की, गझल फारसी साहित्यातून उर्दू, हिंदी व मराठी साहित्यात अवतरली. गझल ही मूळची इराणी उर्दू मधु मदिरा पण आजकाल 'गझल' ही कोणा एका भाषेची मक्तेदारी राहिलेली नाही. आधुनिक मराठीचे गझल सम्राट कवि श्री. सुरेश भट म्हणतात की, ज्याप्रमाणे मोटार-कारची यंत्ररचना कोणत्याही देशाच्या मालकीची नसते, त्याच-प्रमाणे गझल हा काव्यप्रकार कोणत्याही भाषेच्या मालकीचा

नाही. ही गोष्ट आपण सर्वप्रथम ध्यानी घेतली पाहिजे. तसंच गझल लिहिणं ही कोणत्याही एका कवीची मिरासदारी, मक्तेदारी नाही, हे पण लक्षात घ्यायलां पाहिजे.

'गझल' या शब्दाचा मूळ अर्थ मृग किंवा हरीण. मऊ गोजिऱ्या, सुंदरसाजिऱ्या हरिणाच्या चालीत विलोभनीय लालित्य, चंचल चपलता व सुकुमार सौंदर्य दिसून येते, तशी सुंदरतेची मार्मिक प्रचीती व थेट हृदयाला जाऊन भिडणारी अनुभूती या काव्यरचनेतून जाणवते. म्हणून ह्या काव्यप्रकाराला 'गझल' हे नांव पडलं असावं कदाचित, म्हणून 'जिनकी आँखों में हो गझल का सुरूर उन गझालों की याद आती है।' नयनरम्य हरिणाच्या चालीतलं लोभस लालित्य व अरुण तांबूस लावण्य मानवी मनाला मोहून टाकणारं असतं ते खरंच, परंतु उर्दू शायरांना जखमी विरही हरिणयुगुलाची दर्दभरी आर्त पुकार अंतरंगात अधिक खोलवर घायाळ करणारी वाटली आहे. म्हणून गझल म्हणजे संकटात सापडलेल्या हरिणाची आर्त पुकार–चित्कार! गझल म्हणजे दर्दभरे गीत!

आधुनिक युगातील उर्दू गझल सम्राट कै. रघुपति सहाय 'फिराक' यांनी गझलेची व्याख्या मोठ्या भावपूर्ण उद्‌गारात केली आहे. 'जब कोई शिकारी जंगल में कुत्तों के साथ हिरन का पीछा करता है और हिरन भागते भागते किसी ऐसी झाडी में फँस जाता है जहाँ से वह निकल नहीं सकता, उस समय उसके कंठसे एक दर्दभरी आवाज निकलती है, उसी करुण स्वर को 'गझल' कहतें हैं। इसलिए विवशता का दिव्यतम रूप म प्रकट होना, स्वर का करुणतम हो जानाही गझल का आदर्श है।'

उदा. १) ये न थी हमारी किस्मत के विसालेयार होता।
अगर और जीतें रहते यही इन्तजार होता॥

२) कितना बदनसीब हैं 'जफ़र' दफन के लिए ।
दो गज ज़मीं भी न मिल सकी कू-ए-यार में ।।

विवशतेचं दिव्यतम रूप गझलेच्या करुणस्वरांनी मनाला भिडणारं, उर्दू शायरे आज़म 'फिराक'ला अत्यंत आदर्श व महत्त्वाचं वाटतं, पण गझलेचा एक रोमानी (Romantic) रंगही आहे. गझल म्हणजे प्रेयसीसंगें केलेल्या प्रणयमधुर गुजगोष्टी. साहजिकच प्रणयिनीबरोबर कोमल हळुवार स्वरात केलेल्या मधुर गुजगोष्टीत प्यार, मोहब्बत व शृंगार प्रणयाराधन असलेल्या भाव-भावनांचं प्राधान्य असणारच! प्रेयसीबरोबर केलेल्या मधु गुज-गोष्टीत हवापाणी आणि तेलमीठ मिरचीच्या भावांची थोडीच चर्चा असणार! भुक्तभोगी प्रणयी युगुलांना अधिक सांगणे न लगे! उर्दू गझलेमध्ये प्यार-मोहब्बत, इश्क, आशिकी यांचं सुरुवातीला प्राधान्य होतं. (अजूनही आहे आणि भावी काळातही राहील) परंतु पुढे पुढ हळुवार कोमलमधुर भावनांच्या बरोबर इतर भाव-भावनांचादेखील आविष्कार उर्दू गझलेत हळूहळू होऊ लागला आणि इश्क-मोहब्बतीबरोबर देशभक्ती, धर्म, आध्यात्म या भाव-भावनांचाही अंतर्भाव तिच्यात अनायास कालमानानुसार होऊ लागला. उर्दू गझलेच्या विकासाच्या वाटचालीत हे असले टप्पे लक्षणीय म्हणावे लागतील. यामुळे उर्दू गझलेच्या कक्षा हळूहळू विस्तारू लागल्या. गझलेची ही लवचिक सर्वसमावेशकता गझलेचं सामर्थ्य अन् कमजोरीपण म्हणावी लागेल. गझलेच्या अंगभूत लवचिकतेमुळे नव कवी सुद्धा आपल्या आधुनिक युगातील संवेदन-शील अनुभूतींच्या अभिव्यंजनेसाठी पुन्हा गझलेकडे आकर्षिले गेले असावेत.

भारतीय उर्दू कवींचे मुकुटमणी कै. 'फ़िराक' गोरखपुरी गझल की तारीफ यूं फर्माते हैं, "गझल के शेरों के विषव सीमित नहीं हैं, फिर भी उसमें मुख्यत: करुणा, प्रेम व समर्पण केही भाव

नाही. ही गोष्ट आपण सर्वप्रथम ध्यानी घेतली पाहिजे. तसंच गझल लिहिणं ही कोणत्याही एका कवीची मिरासदारी, मक्तेदारी नाही, हे पण लक्षात घ्यायलां पाहिजे.

'गझल' या शब्दाचा मूळ अर्थ मृग किंवा हरीण. मऊ गोजिऱ्या, सुंदरसाजिऱ्या हरिणाच्या चालीत विलोभनीय लालित्य, चंचल चपलता व सुकुमार सौंदर्य दिसून येते, तशी सुंदरतेची मार्मिक प्रचीती व थेट हृदयाला जाऊन भिडणारी अनुभूती या काव्यरचनेतून जाणवते. म्हणून ह्या काव्यप्रकाराला 'गझल' हे नांव पडलं असावं कदाचित, म्हणून 'जिनकी आँखों में हो गझल का सुरूर उन गझालों की याद आती है।' नयनरम्य हरिणाच्या चालीतलं लोभस लालित्य व अरुण तांबूस लावण्य मानवी मनाला मोहून टाकणारं असतं ते खरंच, परंतु उर्दू शायरांना जखमी विरही हरिणयुगुलाची दर्दभरी आर्त पुकार अंतरंगात अधिक खोलवर घायाळ करणारी वाटली आहे. म्हणून गझल म्हणजे संकटात सापडलेल्या हरिणाची आर्त पुकार–चित्कार! गझल म्हणजे दर्दभरे गीत!

आधुनिक युगातील उर्दू गझल सम्राट कै. रघुपति सहाय 'फिराक' यांनी गझलेची व्याख्या मोठ्या भावपूर्ण उद्गारात केली आहे. 'जब कोई शिकारी जंगल में कुत्तों के साथ हिरन का पीछा करता है और हिरन भागते भागते किसी ऐसी झाडी में फँस जाता है जहाँ से वह निकल नहीं सकता, उस समय उसके कंठसे एक दर्दभरी आवाज निकलती है, उसी करुण स्वर को 'गझल' कहतें हैं। इसलिए विवशता का दिव्यतम रूप म प्रकट होना, स्वर का करुणतम हो जानाही गझल का आदर्श है।'

उदा. १) ये न थी हमारी किस्मत के विसालेयार होता।
अगर और जीतें रहते यही इन्तजार होता॥

२) कितना बदनसीब हैं 'जफ़र' दफन के लिए ।
दो गज ज़मीं भी न मिल सकी कू–ए–यार में ॥

विवशतेचं दिव्यतम रूप गझलेच्या करुणस्वरांनी मनाला भिडणारं, उर्दू शायरे आज़म 'फिराक'ला अत्यंत आदर्श व महत्त्वाचं वाटतं, पण गझलेचा एक रोमानी (Romantic) रंगही आहे. गझल म्हणजे प्रेयसीसंगं केलेल्या प्रणयमधुर गुजगोष्टी. साहजिकच प्रणयिनीबरोबर कोमल हळुवार स्वरात केलेल्या मधुर गुजगोष्टीत प्यार, मोहब्बत व शृंगार प्रणयाराधन असल्या भाव-भावनांचं प्राधान्य असणारच! प्रेयसीबरोबर केलेल्या मधु गुज-गोष्टीत हवापाणी आणि तेलमीठ मिरचीच्या भावांची थोडीच चर्चा असणार! भुक्तभोगी प्रणयी युगुलांना अधिक सांगणे न लगे! उर्दू गझलेमध्ये प्यार-मोहब्बत, इश्क, आशिकी यांचं सुरुवातीला प्राधान्य होतं. (अजूनही आहे आणि भावी काळातही राहील) परंतु पुढे पुढ हळुवार कोमलमधुर भावनांच्या बरोबर इतर भाव-भावनांचादेखील आविष्कार उर्दू गझलेत हळुहळू होऊ लागला आणि इश्क-मोहब्बतीबरोबर देशभक्ती, धर्म, आध्यात्म या भाव-भावनांचाही अंतर्भाव तिच्यात अनायास कालमानानुसार होऊ लागला. उर्दू गझलेच्या विकासाच्या वाटचालीत हे असले टप्पे लक्षणीय म्हणावे लागतील. यामुळे उर्दू गझलेच्या कक्षा हळुहळू विस्तारू लागल्या. गझलेची ही लवचिक सर्वसमावेशकता गझलेचं सामर्थ्य अन् कमजोरीपण म्हणावी लागेल. गझलेच्या अंगभूत लवचिकतेमुळे नव कवी सुद्धा आपल्या आधुनिक युगातील संवेदन-शील अनुभूतींच्या अभिव्यंजनेसाठी पुन्हा गझलेकडे आकर्षिले गेले असावेत.

भारतीय उर्दू कवींचे मुकुटमणी कै. 'फ़िराक' गोरखपुरी गझल की तारीफ यूं फर्माते हैं, "गझल के शेरों के विषव सीमित नहीं हैं, फिर भी उसमें मुख्यतः करुणा, प्रेम व समर्पण केही भाव

प्रदर्शित किये जातें हैं, गझलों में चूंकि एक ही शेर में पूरी बात कह देनी होती है, इसलिए उनमें प्रतिकात्मकता का बहुत सहारा लिया जाता है और चूंकि एक एक शब्द विभिन्न परिस्थितियों में असंख्य वस्तुओं का प्रतीक हो सकता है, इसलिए धीरे धीरे गझल में व्यापकता की कला इतनी विकसित हो गई है कि एकही शेर प्रतीक रूप में आध्यात्मिक, सामाजिक, राजनीतिक और व्याव-हारिक जीवन को एकसा लागू हो सकता है। इसी आधार पर दार्शनिक **(Philosophical)** तथ्यों को कविता के साथ सामने लाने में गझल का प्रयोग बहुत किया जाता है, इसलिए गझल की परम्परा गंभीरता और तत्वज्ञान की परम्परा बन गई है, यद्यपि उपरी दृष्टि से देखने पर उसमें आशिक–माशुक के चोंचलों के अलावा कुछ भी नहीं दिखायी देता, यही गझल की तारीफ है।"

गझलेच्या परिभाषेविषयींच्या वैशिष्टयांचा विचार करून सिकंदर अली 'वज्द' यांनी एका मिसऱ्यात थोडक्यात सांगितलं आहे– "जिनकी आँखों में है गझलों का सुरूर, उस गजालों की याद आती है।"

(ज्यांच्या निर्मळ निळया डोळयात हरिख खेळतो, असल्या मृगांची याद येते.)

## गझलचे विविध प्रकार

विदर्भ कवि आणि मराठी गझलेचे मुकुटमणी सुरेश भट यांच्या शब्दात गझलेची व्याख्या अशी आहे, "एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या २–२ ओळींच्या किमान पांच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल."

समस्त विपुल उर्दू गझल संभाराचं सिंहावलोकन करून उर्दू साहित्याच्या विद्वान समीक्षकांनी गझलेचं वर्गीकरण खालीलप्रमाणे

केलेलं आहे. उर्दू गझलेंच्या विकासाच्या वाटचालीतले टप्पे म्हणून यांना संबोधता येईल. उदा.

१) रिवायती गझल(परम्परावादी गझल, परपंरायुक्त गझल)

२) तरक्कीपषंद गझल (प्रगतिवादी गझल किंवा विद्रोही गझल)

३) जदीद गझल (प्रयोगवादी किंवा आधुनिक नवी गझल)

४) मजाहिया गझल (हास्यविनोदयुक्त गझल किंवा व्यंग्यविनोदयुक्त गझल)

रिवायती गझल म्हणजें परम्परायुक्त गझल किंवा परम्परावादी गझल. उर्दू काव्यभंडारात गझलेची एक समुन्नत व समृद्ध अखंड परम्परा चालत आलेली आहे. अमीर खुसरो, (१३ वीश) सिराज-ए-वलीपासून ते थेट अख्तरमालेगांवीपर्यंत छोटे मोठे उर्दू शायर परम्परावादी गझलेचेच शायर समाजाला हरकत नसावी. अशा प्रकारे परम्परायुक्त गझलेची रचना करणारे उर्दूमध्ये असंख्य शायर सापडतील, किंबहुना रिवायती गझल लिहिणारांचे उर्दूमध्ये पेवच फुटलेले असते...म्हणून गमतीनं असं म्हणता येईल की, उर्दू जबानच्या समाजामध्ये १० लोक असले व त्यांना एक छोटासा कंकर फेकून मारला तर त्यातल्या ९.९ शायरांना लागल्या शिवाय तो राहणार नाही आणि उरलेला.१ पॉइंट उर्दू माणूसही 'किंचित शायर'च निघेंल. कारण उर्दू समाजात हरेक माणूस बहुधा 'शायरे आजम'च असतो, असं म्हणतात. म्हणून 'रवायती गझल' 'कहनेवाले उर्दू शायरे आजम 'गाजर गवता ऐसे मातले उदंड' असं म्हटल्यास वावगं वाटू नये.

तरक्कीपसंद गझल म्हणजे प्रगतिवादी गझल किंवा विद्रोही गझल. रिवायती गझल बऱ्हंशी परम्परांचं पालन करणारी असते

प्रदर्शित किये जातें हैं, गझलों में चूंकि एक ही शेंर में पूरी बात कह देनी होती है, इसलिए उनमें प्रतिकात्मकता का बहुत सहारा लिया जाता है और चूंकि एक एक शब्द विभिन्न परिस्थितियों में असंख्य वस्तुओं का प्रतीक हो सकता है, इसलिए धीरें धीरे गझल में व्यापकता की कला इतनी विकसित हो गई है कि एकही शेर प्रतीक रूप में आध्यात्मिक, सामाजिक, राजनीतिक और व्यावहारिक जीवन को एकसा लागू हो सकता है। इसी आधार पर दार्शनिक (Philosophical) तथ्यों को कविता के साथ सामने लाने में गझल का प्रयोग बहुत किया जाता है, इसलिए गझल की परम्परा गंभीरता और तत्त्वज्ञान की परम्परा बन गई है, यद्यपि उपरी दृष्टि से देखने पर उसमें आशिक–माशुक के चोंचलों के अलावा कुछ भी नहीं दिखायी देता, यही गझल की तारीफ है।"

गझलेच्या परिभाषेविषयींच्या वैशिष्टयांचा विचार करून सिकंदर अली 'वज्द' यांनी एका मिसऱ्यात थोडक्यात सांगितलं आहे– "जिनकी आँखों में है गझलों का सुरूर, उस गजालों की याद आती है।"

(ज्यांच्या निर्मळ निळया डोळयात हरिख खेळतो, असल्या मृगांची याद येते.)

## गझलचे विविध प्रकार

विदर्भ कवि आणि मराठी गझलेचे मुकुटमणी सुरेश भट यांच्या शब्दात गझलेची व्याख्या अशी आहे, "एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या २–२ ओळींच्या किमान पांच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल."

समस्त विपुल उर्दू गझल संभाराचं सिंहावलोकन करून उर्दू साहित्याच्या विद्वान समीक्षकांनी गझलेचं वर्गीकरण खालीलप्रमाणे

केलेलं आहे. उर्दू गझलेंच्या विकासाच्या वाटचालीतले टप्पे म्हणून यांना संबोधता येईल. उदा.

१) रिवायती गझल (परम्परावादी गझल, परपंरायुक्त गझल)

२) तरक्कीपषंद गझल (प्रगतिवादी गझल किंवा विद्रोही गझल)

३) जदीद गझल (प्रयोगवादी किंवा आधुनिक नवी गझल)

४) मजाहिया गझल (हास्यविनोदयुक्त गझल किंवा व्यंग्यविनोदयुक्त गझल)

रिवायती गझल म्हणजें परम्परायुक्त गझल किंवा परम्परावादी गझल. उर्दू काव्यभंडारात गझलेची एक समुन्नत व समृद्ध अखंड परम्परा चालत आलेली आहे. अमीर खुसरो, (१३ वीश) सिराज-ए-वलीपासून ते थेट अख्तरमालेगांवीपर्यंत छोटे मोठे उर्दू शायर परम्परावादी गझलेचेच शायर समाजाला हरकत नसावी. अशा प्रकारे परम्परायुक्त गझलेची रचना करणारे उर्दूमध्ये असंख्य शायर सापडतील, किंबहुना रिवायती गझल लिहिणारांचे उर्दूमध्ये पेवच फुटलेले असते...म्हणून गमतीनं असं म्हणता येईल की, उर्दू जबानच्या समाजामध्ये १० लोक असले व त्यांना एक छोटासा कंकर फेकून मारला तर त्यातल्या ९.९ शायरांना लागल्या शिवाय तो राहणार नाही आणि उरलेला .१ पॉइंट उर्दू माणूसही 'किंचित शायर'च निघेल. कारण उर्दू समाजात हरेक माणूस बहुधा 'शायरे आजम'च असतो, असं म्हणतात. म्हणून 'रवायती गझल' 'कहनेवाले उर्दू शायरे आजम 'गाजर गवता ऐसे मातले उदंड' असं म्हटल्यास वावगं वाटू नये.

तरक्कीपसंद गझल म्हणजे प्रगतिवादी गझल किंवा विद्रोही गझल. रिवायती गझल बव्हंशी परम्परांचं पालन करणारी असते

तर तरक्कीपसंद गजल परम्पराविरोधी अधिकांशी आढळते. प्रगतिवादी लेखक–संघाचं प्रथम अधिवेशन ई. सन्. १९३६ साली लखनौ ( उ. प्र. ) येथे भरलं होत. हिंदीचे उपन्यास सम्राट प्रेमचंदजींनी या प्रगतिवादी लेखक संघाच्या सर्वप्रम अधिवेशनाची सदारत (अध्यक्षता) केली होनी. साहित्य सम्राट प्रेमचंदजींच्या अध्यक्षीय भाषणानं त्यावेळी भारतीय साहित्य विश्वांत खूपच खळबळ माजवून दिली होती. दलित शोषित भारतीय किसान–मजूरांचे प्रतिनीधी साहित्यिक, एक मानवतादी लेंखकाच्या व्यापक भूमिकेतून तत्कालीन प्रगतिवादी लेखक संघाच्या अधिवेशनाचं अध्यक्षपद प्रेमचंदजींनी भूषवलं. नंतरच्या काळात भारतीय कम्युनिष्ट पार्टीन प्रगतिवादी लेखक संघाला आपल साहित्य क्षेत्रातील हत्यार म्हणून वापरलं त्यामुळे व्यापक मानवतावादी भूमिकेत साहित्य सर्जन करणारे बरेचसे साहित्यकार प्रगतिवादी लेखक संघातून बाहेर पडले (नंतर खद्द प्रेमचंदजीही प्रगतिवादी लेखक संघातून उपरण झटकून मोकळे झाले, बाहेर आले) हे मानवतादी लेखक कवि नंतर स्वतःला 'प्रगतिशील लेखक कवि' म्हणवू लागले. 'प्रगतिवादी लेंखक संघा'चा व्यापक प्रभाव भारतीय भाषांच्या साहित्य व साहित्यिकांवर दिसून आला. प्रगतिवादी लेखक संघाच्या झेंडयाखाली एकत्र जमलेंल्या उर्दू लेखक–कवींनी तरक्कीपसंद गझल त्यावेळी विपुल प्रमाणात लिहीली, अजूनही त्यातलें काही जण अशी प्रगतिवादी गझल लिहिताहेत. तरक्कीपसंद गझल लिहीणाऱ्यांत प्रामुख्यांनं सरदार अली जाफरी, कैफी आजमी, 'जोश' मलीहाबादी 'फैज अहमद', 'फैज', साहिर लुधियानवी, जोय अन्सारी, बशरनवाज वगैरे शायर उल्लेखनीय आहेत.

तरक्कीपसंद गझलेतील कनस्तरपीट नारेबाजी, कंठाळी आक्रोश, संकीर्णता व एकसूरीपणामुळे पुढे पुढे तरक्कीपसंद गझलेविरुद्ध प्रतिक्रिया होऊ लागली आणि पाश्चात्त्य देशात जसे

नवकाव्य (New Poetry) चं आंदोलन सुरु झालं, त्याचा परिणाम उर्दू शायरीवर होऊन 'जदीद शायरी' (नव कविता) प्रकाशात यऊ लागली आणि 'जदीद शायरी'चं अभिन्न अंग म्हणून 'जदीद गझल' (नवी गझल, प्रयोगवादी गझल किंवा आधुनिकतावादी गझल) आज बाजी मारुन गेली आहे. उर्दू शायरीच्या क्षेत्रात महाराणी बनून रसिकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाली आहे. जदीद गझलेच्या शायरांनी कविता व गझलेला नव नवीन प्रयोगांचे क्षत्र मानलं. आधुनिक युगातील नवीन संवेदनशीलतेची संवाहिका जदीद गझल झाली. नव युगातील नवनवीन भाव भावना व नव विचार नव नवीन उपमा उपमान नवीन प्रतीकं व नवनवीन प्रतिमांचं चित्रण करणारी 'जदीद गझल (अधुनिकतावादी नवी गझल) उर्दू काव्य प्रेमीच्या गळ्यातील कंठहार झालेली आजकाल दिसून येते. उर्दू 'जदीद गझल' लिहीणाऱ्या शायरांमध्य रघुपतिसहाय 'फिराक' गोरखपुरी, नून–मीम राशिद, निदा फाजली, काझी सलीम, फुर्जल जाफरी, मीरांजी, बशीर बदर इ.

मजाहिया गझल म्हणजे हास्यविनोदयुक्त गझल किंवा व्यंगविनोदप्रधान गझल. प्रत्येक शायर कमीमधी मौजमस्तीच्या हलक्या फुलक्या मूडमध्ये हास्य विनोदयुक्त शर लिहीत असतो परंतु काही शायर लोकात व्यंग विनोद (Satire Humour) ची प्रवृत्ती प्राधान्येकरून दिसून येते. तसच जदीद गझल किंवा नवी गझलची अभिव्यंजना मुख्यत्वे तिरकस (Oblique) शैलीतली जाणवते. पण व्यग विनोद, उपहास उपरोध (Satire) युक्त शेरांच्या पाठीमागे शायराच्या दिलाची दर्दभरी वेदना दिसून येते. अशी मजहिया गझल लिहणाऱ्या शायरांमध्ये 'अकबर' इलाहाबादी यांचं नांव प्रामुख्यान समोर येते. मजहिया गझल काही विशिष्ट प्रवृत्तीची स्वतंत्र काव्यधारा मानता येणार

नाही. पण गझलेच्या फॉर्ममध्ये उपहास उपरोध्र गर्भ व्यंगविनोद (Satire) युक्त गझल म्हणजे मजहिया गझल.

## गझलचा आकृतीबंध

आता आपण गझलेच्या फॉर्मविषयी विचार करु या. 'गझल' या काव्यप्रकाराला स्वतःचा असा स्वतंत्र व आगळा-वेगळा अकृतिबंध (Form) असतो. असल्या विशिष्ट व स्वतंत्र तंत्रयुक्त, आकृतीबंधयुक्त काव्य रचनेलाच 'गझल' संबोधन देता येईल, अन्यथा नाही. या गझलेच्या आगळ्या वेगळ्या आकृतीबंधात कोणालाही बदल करता येणार नाही. या आकृती-बंधाच्या नियमांचं-बंधनाचं काटेकोरपणे पालन करुन निर्दोष तंत्रयुक्त व विशुद्ध गझल रचता येणं शक्य आहे. पण याठिकाणी **गझल हे 'वृत्त' नसून मुळात 'वृत्ती च आहे, हे सदैव लक्षात असू द्यावे**

गझलेच्या पहिल्या शेराला 'मतला' संबोधतात. प्रत्येक शेर दोन ओळींचा असतो. 'मतला' शब्द 'तुलू होना' पासून साधित झाला आहे. 'तुलू होना' म्हणजे उगवणे, निघणे, उदय पावणे उदा. अफताब तुलू होना, म्हणजे सूर्य उगवला 'गझलेचा' मतला म्हणजे सुरवातीच्या दोन ओळीं. शेराच्या दोन ओळीना मिसरा असे म्हणतात., पहेला मिसरा, दुसरा मिसरा. मतल्याच्या शेरात यमक काफिया अन् अंत्ययमक (रदीफ) असते. जसे उर्दू गझल सम्राट 'गालिब'च्या सुप्रसिद्ध गझलेतील हा मतला'-

ये न थी हमारी किसमत कि बिसाले यार होता।<br>
अगर और जीते रहतें यही इंतिजार होता।

वरील शेरामध्ये 'होता' हे अन्त्ययमक (रदीफ) आणि यार जार किंवा 'आर' हे उपान्त्ययमक (काफिया) होय. मराठी गझल सम्राट कविवर्य सुरेश भट यांच्या गझलेचं उदाहरण नमुनादाखल घेता यईल :-

राहिले रें अजून श्वास किती
जीवना ही तुझी मिजास किती.

प्रस्तुत गझलेतील मतल्याच्या ह्या शेरात दोन्ही ओळीत 'श्वास' आणि 'निजास' अशी यमके आहेत. आणि 'किनी' हे अन्त्ययमक उर्फ रदीफ आहे. आणि एकच मात्रावृत्त पण आहे.

मतल्यानंतर येणाऱ्या प्रत्येंक शेराच्या दुसऱ्या ओतळी यमक आणि अन्त्ययमक येत असते. आधी उदाहरण 'गालिब'च्या गझलेचे–

कोई मेरे दिल से पूछें तेंरे तीरे नीमकश को।
ये खलिश कहाँसे होती जो जिगर के पार होता।

या शेरात 'पार' हे उपान्त्ययमक (काफिया) अन 'होता' हे अन्त्ययमक (रदीफ) होय कवि श्री. सुरेश भटांच्या गझलेचे उदाहरण घेऊ या :–

सोबतीला जरी तुझी छाया–
मी करु पांगळा प्रवास किती ?

या शेरातील 'प्रवास' हे उपान्त्ययमक (काफिया) अन् 'किती' हे अन्त्ययमक (रदीफ) होय.

गझलेतील शेरांना एकाच विषयाचं बंधन नसतं. एका गझलेमध्ये विविध विषय कवि हाताळू शकतो, उदा. एक शेर राजकारणा वरला असेल तर दुसरा शेर रोमानी रंगाचा, तर तिसरा शेर समाजकारण किंवा धर्मकारणाकरता देखील असू शकतो. म्हणजे गझल विविधरंगी कोमल सुगंधी कळ्या-पाकळ्यांचा मनमोहक सुरेख, सहज सुंदर पुष्पगुच्छ (गुलदस्ता). गझलेच्या गुलदस्त्यातील प्रत्येक फुलाचा रंग आगळा–वेगळा

रंग निरनिराळा! प्रत्येक शेराची रंगत न्यारी, संगत प्यारी. गझलेच्या प्रत्येक शेराचं आगळं–वेगळं व स्वतंत्र अस्तित्व हे गझलेचं एक प्रमुख वैशिष्टय. गझलेतला एखादा शेरा सुटा व वेगळा करुन वाचला तरी तो एक मर्मस्पर्शी, हृदयस्पर्शी व रसिक वाचकांच्या काळजाला हात घालणारा सर्वांगसुंदर स्वतंत्र कविताच असते. म्हणून गझल म्हणजे दुसऱ्या शब्दात सांगायच झालं तर, अनेक स्वतंत्र कविताचा एक कलापूर्ण नयन मनोहर चित्ताकर्षक गुलजार गुलदस्ता!... त्यामुळे गझलचे आशयसधन मर्मस्पर्शी शेर काव्य रसिकांच्या हृदयांत घर करून राहतात. अन् प्रसंग विशेषी ओठावर सहजपणे तरळतात. प्रत्येक शेराचा वेगळा सहजसुंदर आस्वाद रसिकाला घेता येतो. याविषयी मराठीतील सुप्रसिद्ध इतिहास संशोधक, उर्दू काव्याचें दर्दी रसिक व गाढे जाणकार व विद्वान समीक्षक श्रद्धेय श्री. सेतु माधवरावजी पगडी म्हणतात– याला उत्तर हेच की, गझलमधील प्रत्येक शेर स्वतंत्र समजून त्याचे रसग्रहण करावें. एक कल्पता एकाच शेरामधून मांडण्याचे आणि ती यशस्वीपणे मांडण्याचे कौशल्य हे उर्दू उत्तम काव्याचे गमक आहे. टलाट जोडून शेर रचणारे कवि असंख्य आहेत. उर्दूत तर त्याचे पेवच फुटले आहे. पण अर्थपूर्ण, प्रभावी आणि परिणामकारक रचना आणि तीही दोन ओळीत करणे अत्यंत अवघड आहे.'

(उर्दू काव्यांचा परिचय पान २८)

गझलेमध्यें किमान ५ शेर असावेत असा सर्वसाधारणपणे दंडक आहे. प्रत्यक शेर स्वतंत्र अन् निरनिराळ्या विषयावरला असू शकतो. परंतु काही गझलामध्ये एकच आयडिया, थीम किंवा विषय हाताळलेला दिसून येतो व त्यांचा निर्वाह किंवा पाठपुरावा आदि पासून अंतापर्यंत केलेला असतो. अशा गझलांना 'गझल मुसलसल' असे संबोधण्यात येते, उर्दू गझल सम्राट रघुपति सहाय 'फिराक' गोरखपुरी गझले– मुसलसल

संबंधी सांगताहेत 'पुराने जमाने में गजलका एक और रूप प्रचलित था, जिसे गजल 'मुसलसल' कहते हैं इसमें शेर अलग अलग विषयोंपर नहीं होते, बल्कि एकही विषयपर कहे हुए होतें हैं, बल्कि उनमें परस्पर संबंध भी होता है, वर्तमान समयमें नज्मों (कविता) के कारण इस प्रकारकी गजलकी जरुरत ही नहीं रही.'

आमचे कविमित्र श्री. सुरेश भट या संबंधी विचारमंथन करून सांगताहेत– 'गझल हे फक्त 'श्राव्यकाव्य' आहे, असे म्हणणे साफ चुकीचे आहे. तसे असते तर भारतीय उपखंडात मोठमोठ्या कवींच्या गझलांचे 'दीवान' घेऊन लोक रात्रीच्या रात्री जाळून काढून वाचत बसले नसते. गझल आणि तीमधील शेर नुसते कानांवर पडण्यासाठी नसतात, त्यांचे चिंतन होत असते! ती नशा आजन्म चढलेली असते. एकेक शेर (मैफल किंवा मुशाइरा सुरू नसूनही ) आपणास जीवनाचा क्षणोक्षणी एकेक प्रत्यय देत असतो. गझल म्हणजे एक तत्वज्ञानच आहे. आणि ती एक जीवन शैलीही आहे. जेव्हा आपण जीवनाच्या विविध चवी घेत असतो तेव्हा आपण गझलच जगत असतो.

**'एकेक शेर म्हणजे जगण्याची एकेक चव, एकेक प्रत्यय!'**

काही गझलांमध्ये अन्त्ययमक म्हणजेच रदीफ नसते. अशा गझलांना गैरमुरद्दक म्हणतात. माझ्याच एका गैर मुरद्दक गझलेचे काही शेर वानगीदाखल पहा –

नव जीवन मुशाफिरा, चल एकला एकला...
चालता तू एकला... तुजसंग ये काफिला ।
परिसूनी तुझी साद, देई ना कुणि प्रतिसाद
वादळीं दीप उजळी,... पावलं पुढती उचला ।...

आता हिंदी उर्दूमधील 'गैर मुरद्दक' गझलेचे काही शेर पेश करतो :–

पहाड से दिन और रेगिस्तान सी रातें.
इस बियाबानमें करें तो किससे करें बातें ?
तपती हुई रेत और जलते हुए पाँव,
निभाते किस तरह दुनियाके रिश्ते–नाते ?
मिलता जो मौका तो इस दुनियासे अलग
साथ आपके हम दुनिया नई बसाते।

गझलेच्या शेवटच्या शेराला 'मकता' म्हणून संबोधतात. मकत्याच्या शेवटच्या शेरात कवीचं साहित्यिक नांव किंवा टोपण नांव बहुधा असतं. त्यामुळे हा 'मकता' गझल कोण्या कवीनं लिहिली, हे रसिकांना सांगत असे. पूर्वीच्या काळी वर्तमानपत्रं, मासिकं व मुद्रणालयं नव्हती म्हणून त्या काळात गझल कुणाची हे सांगण्यासाठी 'मकत्याच्या' शेरात कवीचं 'तखल्लुस' म्हणजेच टोपण नावाचा आवर्जून न चुकता उल्लेख केलेला असे. असंख्य वर्तमानपत्रं, ढीगभर मासिकं व शेकडो मुद्रणालयांच्या आधुनिक जमान्यात आता 'तखल्लूस' रूपी आरक्षण (रिझर्व्हेशन) ची गरज उरलेली नाही. 'चकबस्त' सारखा एखादा मस्त शायर टोपण नांवाचं नाव घेत नाही. 'चकबस्त' हे त्यांचे आडनावच टोपण नावाचं काम करतं. म्हणून ते गमतीदारपणानं एका शेरात सांगतात :–

'जिक्र क्यों आयेगा बज्मे शुअरामें अपना ?
मैं तखल्लुसका भी दुनियामें गुनहगार नहीं।'

(अर्थात कवि सम्मेलनांत माझा उल्लेख कशाला येईल ? या जगांत मी टोपण नांवाचाही गुन्हेगार नाहीय्.)

मी स्वतः देखील टोपण नावाचा माझ्या गझलात उल्लेख केलेला नाही. काही गझलातून माझं नांव चपखलपणे चतुराईनं मी उपयोगात आणलेले आहे. पण बहुधा माझ्या गझलातील मकत्यामध्यें माझ्या नांवाचा नांवापुरताहीं उल्लेख केलेला नाही.

आपल्या स्वतः संबंधीं बोलणं– मला नेहमी अवघड वाटत आलं आहे. कमी बोलावं तर संकोच आड येंतो. जास्त बोलावं तर आत्मश्लावेचा दोष माथी मारला जातो. तरीपण शक्यतो तटस्थ वृत्तीनं (Objectively) स्वतः संबंधी आणि माझ्या गझलांच्या काव्यविष्कारासंबंधी दोन शब्द सांगतो. अशावेळीं माय मराठीचे कवि कुलगुरु ज्ञानदेव माऊलीच्या मवाळ रसाळ अमृतवाणीची अंगुली धरून नितांत विनम्रपणांनं सहृदय काव्य-रसिकांची विनवणी करावीशी वाटतें :–

तरी न्यून तें पुरते । अधिक तें सरतें ।
करुनि घ्यावे हे तुमते । विनवितु असे ।।

आजच्या मराठी कवितेच्या क्षेत्रात गझल हे चलनी नाणं आहे. नव्या पीढीचे नव्या दमाचे कविवृंद प्रामुख्यानें गझल लिहूं लागले आहेत. मराठी गझलेची सांप्रत समयातील अत्यंत लोक-प्रियता पाहून थोर नवकवीसुद्धा गझलेकडे वळू लागले आहेत. नव-संवेदनशीलता (New Sensibility) मराठी गझलेच्या आकृती-बंधात सुंदर कलात्मक रीतीनं व आशयसघन जोरकसपणानं अभि-व्यंजित होऊ लागली आहे. त्यामुळे मराठी गझल दिवसेंदिवस जनप्रियतेची रेकॉर्ड मोडू तोडू लागली, तर नवल वाटू नये.

शासकीय नोकरीच्या निमित्तानं मला शहर–दर–शहर थोडीबहुत भटकंती करावी लागली. शिक्षण खात्यातील कॉले-जिएट शाखेमध्ये सेवा अर्पण करतांना माझा बहुतांश समय

२६१५ २६२५

औरंगाबाद (मराठवाडा) येथे व्यतीत झाला. औरंगाबाद (मराठवाडा) मराठीचं माहेर घर, तसंच औरंगाबाद (मराठवाडा) उर्दू शायरीचं देखील बलशाली केंद्र म्हणावं लागेल. बहुभाषिक मुशायऱ्यातून याचा प्रत्यय आम्हा मराठी हिंदी कवींना येत असे. बहुभाषिक कवि सम्मेलनांतून उर्दू शायरांची शायरीची नज़ाकत (नाजुकता) व उर्दू गझलेची नफासत (सुंदरता) आम्हाला जाणवत असे. मराठीच्या चांगल्या चांगल्या नवकवींची कवितादेखील त्यापुढे नीरस व फिकी वाटायची. यामुळे मराठी नवकवी हिरमुसले व्हायचे. म्हणून आम्ही उर्दू गझलेचा चांगला अभ्यास करायचं मनाशी ठामपणानं ठरवलं. त्याप्रमाणे उर्दू गझलेचा गहनगाढ अभ्यास करून मराठी कवितेत गझल हा काव्यप्रकार त्यांच्या समस्त गुणवैशिष्ठ्यांनिशी आणायचा आम्ही मराठी भाषिक कविमित्रांनी निर्धार केला आणि त्याचाच सुंदर परिपाक 'मैफल गझलांची'. आमच्या या साहित्यिक अनुष्ठानात व अभियानात आम्हीं कितपत सफल वा असफल झालो, हे तुम्हासारख्या सुजाण दर्दी काव्यरसिकांनी ठरवायचं आहे. सध्या मराठी 'गझलांच्या मैफलीत' आम्ही थोडाबहुत रंग भरू शकलो, तर आम्ही नम्रपणे समजू रंगली आमची 'मैफल गझलांची.' एका उर्दू शायराने एका खूबसूरत शेरात सांगितलंय्- 'हमीं नहीं तो क्या रंगे महफिल!'

दुसरा मुद्दा- गझलचा आकृतिबंध आमच्या कविमनातील जिप्सीला आवडला. आतापर्यंत आम्ही मुक्तछंद कविता, गेय, भावकविता, अभंग, ओवी, रुबाई, मुक्तक इत्यादि विविध काव्यप्रकारांत विपुल काव्यलेखन केलं आहे. गझलेतील प्रत्येक शेर स्वतंत्र अन् वेगवेगळ्या विषयांचा व आशयाचा असू शकतो म्हणून माझ्यातील स्वच्छंद नि स्वतंत्र कवी मानसीच्या कलंदर रोमानी ( Romantic : रोमँटिक अर्थाने ) प्रवृत्तीला गझल

चांगलीच भावली. जीवन आणि जगासंबंधी आमची विविध रंगी अनुभूति आम्ही गझलेच्या आकृतिबंधात शब्दबद्ध केलेली आहे. तुम्हासारख्या सहृदय चोखंदळ काव्यरसिकांनी माझ्या गझलेच्या यशापयशाविषयी निर्वाळा द्यायचा आहे. आपकी पेशे नजर है हमारी गझलों का नजराना! . . .

तिसरा मुद्दा :– नवयुगातील नवीन संवेदनशीलता ( Sensibilility ) अनुकूल अशी नवी काव्यभाषा नवकवींना निर्माण करावी लागते. त्यासाठी नवीन प्रतिकं अन् नवीन प्रतिमांची कास नवकवीस धरावी लागते. माझी नवी मराठी गझल परंपरागत गझलेपेक्षा अगदी आगळी वेगळी आहे. म्हणूनच एका गझलेत मी सांगितलंय् :

'मराठी गझलेमधी रंग माझा आगळा! ...'

आम्ही नवीन अनुभूतींच्या अभिव्यक्तीकरिता नवप्रतिमांचा कलात्मक वापर नव गझलेमध्ये केला आहे. वानगीदाखल एका गझलेतील माझा एक शेर पेश करतोय् :

'बदलत्या 'कॅलेंडरागत' नित नित बदलती निष्ठा।'
'पार्टीबॉस' समोरी. . .निष्ठेचा आव आहे।. . .'

या शेरातील प्रतिवर्षी भिंतीवर टांगले जाणारे व बदलणारे 'नवे कॅलेंडरची नवी प्रतिमा' आणि 'पार्टीबॉस' हीदेखील नवीन प्रतिमा, तसंच संपूर्ण शेरातील वक्रोक्ति–व्याजोक्तीच्या आधारे व्यंजित होणारी आशसघन अभिव्यंजना लक्षणीय व उल्लेखनीय ठरावी.

आमच्या मराठी गझलांमध्ये आम्ही अरबी फारसी उर्दू गझलांतील कांही प्रतीकांचा वापर कुशलतेनं केला आहे. मायबोली मराठी भाषेचं सौंदर्य–सामर्थ्य आम्ही चांगलेच जाणतो.

अमृताच्या पैजा जिंकणाऱ्या रसाळ प्रेमळ लाडीक मऱ्हाठी बोलांच्या सामर्थ्यासंबंधी आम्हांला तिळमात्र शंका नाही. त्याच देशीकार लेणी मराठीला सम्पन्न करण्याच्या सद्उद्देशानं आम्ही रसाळ कलात्मक काव्यमय विदेशीकार नवी लेणी फारसी, उर्दू भाषेतील प्रतिकांचाही चपखलपणे नवा प्रयोग केला आहे. उदाहरणार्थ 'सफर मुशाफर, मैफल, शराब, काफिला, कारवां, अंगडाई इ.' मदालसा नव यौवनेच्या गुलाबी शबाबाइंच्या अंगडाई मध्ये जी लाजवाब लज्जत व स्वप्निल खुमारी आहे ती अंगाला आळोखे पिळोखे देणे यात दिसणार नाही. असल्या प्रयोगांमुळे मायबोली मराठीचं मूळचं अंगभूत सामर्थ्य वाढून तिच्या लालित्यपूर्ण लावण्यात मोलाची भर पडून तिचं सौंदर्य सामर्थ्य अधिकाधिक समृद्ध होईल याबद्दल आमच्या मनात मुळीच संदेह नाही तसं म्हटलं तर मध्य कालीन मराठी भाषेत अरबी फारसी व उर्दू शद्बांची धमाल रेलचेल व तुफान खैरात दिसून येते, या कटु सत्याचा कोण बरं जाणकार इनकार करील? मध्ययुगीन मराठी बखर वाङमय आणि ऐतिहासिक कागदपत्रं याची ऐतिहासिक लेखी साक्ष आहेतच की! आमचा हा मराठी कवितेतील नवा प्रयोग काही सनातनी उच्चभ्रू मराठी टीकाकारांना कदाचित आवडणारही नाही, (काही उदार मतवादी पुरोगामी मराठी समीक्षकांना तो आवडेलही कदाचित) याची आम्हाला मनोमन जाणीव आहे. त्यांच्याकरिता संस्कृत कवि भवभूतीच्या शद्बांत मी म्हणेन –

'ये नाम केचिदिह नः प्रथयन्ति अवज्ञां
जानन्ति ते किमपि तान, प्रति नैष यत्न. ।

उत्पस्यते ऽ स्ति मम को ऽ पि समान धर्मा
कालो ऽ ह्ययं निरवधि विपुलाच पृथ्वी ।।

परवा, अ. भा. मराठी साहित्य सम्मेलनाच्या ठाणें येथे

सम्पन्न झालेल्या ६१ व्या अधिवेशनात 'गझलेचे मराठी कवितेवरील आक्रमण' या विषयावर मोठी उद्‌बोधक साहित्यिक चर्चा झाली. त्यावेळी महनीय प्रवक्तें म्हणून बोलतांना ख्यातनाम इतिहास संशोधक व उर्दू साहित्याचे प्रगाढ अभ्यासक आ. सेतुमाधवराव पगडी म्हणाले,– 'गझल मराठी काव्यउद्यानातील आकर्षक जागा बनेल. परंतु सर्वार्थाने ही वृत्ती मराठी कवितेत समरस होऊ शकणार नाहा.'

आम्ही आ. सेतुमाधवराव पगडी यांच्या मतांशी बव्हंशी सहमत असलो तरी काही बाबतीत आमचा प्रामाणिक मतभेद 'गझल मराठी काव्यउद्यानातील आकर्षक जागा बनेल,' याबद्दल कोणाचेही दुमत होण्याचे कारण नाही. 'परंतु सर्वार्थाने ही वृत्ती मराठी कवितेंत समरस होऊ शकणार नाही' याविषयी मात्र मतभेद व्यक्त करावासा वाटतो. मा. सेतुमाधवराव पगडी यांनी कुठल्या संदर्भात वरील विधान केलं आहे, हे कळायला मार्ग नाही. कदाचित उर्दू कविमनाची वृत्ती आणि मराठी कविमनाची वृत्ती दोघांमध्ये थोडेबहुत अंतर असलं तरी गझलेला अवश्यक असणारी कविमनाची कलंदर वृत्ती मराठी कवींच्या ठिकाणीही विपुल प्रमाणात वास करीत आहे. आणि उर्दू फारसी गझलामधील 'अलामत' प्रतीकां) संबंधी सांगायचं तर उर्दू गझलांतील प्रतीक मराठी गझलाकारांनी चांगलीच आत्मसात करून रिचवली आहेत. इतकंच नव्हे तर नव युगाला अनूकूल नवनवीन प्रतीक व प्रतिमांचा मराठी गझलकारांनी मुक्त हस्तांनी वापर केला आहे. म्हणून मराठी गझल, मराठी नवकवितेच्या क्षेत्रात निर्विवादपणे आता चांगलीच दृढमूल झाली आहे.

गझलेविषयी याच अभिभाषणांत विद्वान समीक्षक सेतुमाधवराव पगडी पुढें उद्‌गारले "उर्दूतील ८० टक्के गझला रद्दी आहेत, परंतु उरलेल्या २० टक्के गझला अप्रतिम आहेत' थोड्या

बहुत फरकानं हीच गोष्ट मराठी गझलेवरही लागू होऊ शकेल. आज मराठी कवितेत गझला विपुल प्रमाणात लिहिल्या जात असल्या तरी अस्सल व अप्रतिम मराठी गझला हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच सापडतील, हेही तितकंच खरं आहे. मा. सेतुमाधवरावांचं उर्दू गझलांसंबंधीचं विधान मराठी गझलांसंबंधी सुद्धा सुसंगत व सयुक्तिक वाटावं याबद्दल दुमत नसाव म्हणून मराठी पिल गझल संभारांतून केवळ चांगल्या व श्रेष्ठ अप्रतिम गझला वेंचून मराठी सहृदय रसिक वाचकांनी नीरक्षीर विवेकानं त्यांचं मनसोक्त व सहृदयपणे रसास्वादन करावे हे उत्तम. आदिकवि ज्ञानदेवांच्या रसील्या शब्दात लागायचं झालं तर—

'जैसें शारदीचिये चंद्रकळे ।
माजि अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मनें मवाळे । चकोरतलगे ।'

मराठी कवितेवरील गझलेच्या आक्रमणाविषयी आपले मत व्यक्त करतांना श्री. सेतुमाधवराव पगडी म्हणाले 'आपण मराठी लोक आक्रमण होते असे सतत ओरडतो. मराठीतील प्रेयसीचं वर्णन आणि उर्दू शायर गालिबचे प्रेयसीचं वर्णन यांत फरक आहे. 'गालिब'चा शृंगार उत्तान नसला तरी धुंद करणारा आहे. मराठीत आनंद लुटण्याची प्रवृती नाही. 'दुःख पर्वता एवढे, सुख जवापाडे 'असंच आपण म्हणत असतो. आपण मराठी माणसांनी सुखाचा आनंद लुटायला शिकलं पाहिजे' वरील गझलेसंबंधी परिसंवादात अन्य वक्तेदेखील बोलेले पण त्यांचं वक्तव्य म्हणजे They also ran

[रेसमध्ये तेही घोडे पळालेत] असंच संक्षेपानं समजावं.

माझ्या 'मैफल गझलांची' शीर्षक गझल संकलनासंबंधी एक दोन गोष्टी थोडक्यात सांगतो. मित्र हो, माझ्या गझल संकलनाच्या भूमिकेला मी 'गझलेची सरगम'-असं संगीतमय

शीर्षक दिलं आहे. गझलगायकी हा हिंदुस्तानी संगीतातील एक विशिष्ट गायकीचा ढंगदार मधुर, स्वतंत्र गायकी प्रकार. गझलगायकीमध्ये बेगम अख्तर, तलत मेहमूद, मेंहदी हसन, मंगेशकर भगिनी [लता व आशा] चित्रासिंह व जगजितसिंह, मेहता पतिपत्नी, अनूप जलोटा, पंकज उधास पर्यन्त अनेक गायक गायिकांनी अलीकडे चांगलंच नांव कमावलं आहे. गझल गायक मूळ गझल सादर करण्यापूर्वी तिची लयमधुर कोमल सरगम आळवतो. म्हणून प्रस्तावना किंवा भूमिकेला आम्ही 'गझलेची सरगम' असं शीर्षक समर्पकपणे दिलं आहे. तसंच अनुक्रमणिका आमच्या लेखी 'गुंजनिका' बनून अवतरली आहे. सुज्ञांस अधिक काय सांगावे! उर्दू शायराच्या सुंदर शद्बांत सांगावस वाटतं.

'हमसे जो हो सका सो कर गुजरे,
अब तेरा इम्तेहान है प्यारे!'

## गझल – मैफल : एक आठवण

मराठी गझल-सम्राट श्री. सुरेश भट यांच्या गझल-गायनाचा एक कार्यक्रम दि. ५ डिसेम्बर, १९८७ रोजी बालगंधर्व रंगमंदीर, जळगांव येथे सम्पन्न झाला. कार्यक्रमला रसिक श्रोत्यांनी चांगली उपस्थिती दिली होती. वरील कार्यक्रमाच्या संदर्भात कविवर्य श्री. सुरेश भट यांचा मुक्काम जळगांवच्या शासकीय विश्रामगृहात होता. सुदैवानं, त्याचवेळी आम्ही देखील जळगांवला होतो. कविश्रेष्ठ श्री. सुरेश भट आणि आमची जुनी ओळख. आम्ही नोकरी निमित्त अमरावतीला असतांना कविवर्य सुरेश भट आमचे एक जिगरी दोस्त. त्यामुळे आम्ही आमचे जुने मित्र श्री. सुरेश भटांची सौजन्य-भेट घ्यायचं ठरवलं. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. ६ डिसें, ८७ (रविवार) रात्री श्री. सुरेश

भटांची व आमची बऱ्याच वर्षानंतर गांट-भेट घडली. अपरिमित आनंद वाटला.

सुरवातीला नमस्कार-चमत्कार झाल्यावर काही औपचारिक-अनौपचारिक इकडच्या तिकडच्या गप्पा-गोष्टी झाल्या. त्यावेळी त्यांच्याबरोबर श्री. कांबळे, श्री. पाटकर (मुंबई) वगैरे मित्रमंडळी होती. बातचीतचा सिलसिला मधेच थांबवून श्री सुरेश भट मला म्हणाले,– 'पवारसाहेब, नवीन लेखन काय केलंत?'

मी म्हणालो – 'लिहितोय् की थोडं बहुत-अजूनही. आजकाल आम्हीपण गझल लिहूं लागलोय.'

सुरेश भट,– 'व्वा, छान! तुम्ही हिन्दी गझल लिहितां की मराठी? कारण, तुम्ही हिन्दीचे प्राध्यापक आहांत.,

मी उत्तरलो,– 'मी हिन्दी आणि मराठी दोन्ही भाषांतून सध्या गझला लिहितोय.'

सुरेश भट– 'काही गझलाबरोबर आणल्यात?'

'होय की!'– अस्मादिक.

'तर मग फक्त दोनच गझला कृपया ऐकवा.' सुरेश भट.

'जरूर. यह हमारा अहोभाग्य है' –मी उद्गारलो,– 'लीजिए, गझल पेश करता हूँ. मतला अर्ज है'–

असं म्हणून आम्ही गळा मोकळा केला, साफ केलान् 'गझलांच्या मैफलीत'–शीर्षक गझलच्या मतल्याचा शेर सादर केला,–

'गझलांच्या मैफलीत सुरंग भरतो आहे . !
नवा शेर पारिजात मस्तीत झरतो आहे !'

त्याबरोबर चहूंबाजूंनी 'व्वा, व्वाह'ची बरसात झाली. त्यानंतर मी दुसरी गझल पेश केली,–

'मैफलींत माझिया अजुनि गझल नवा बहार आहे,
सतारीच्या तारांमधुनि मृदुल नवा झंकार आहे ॥'

सुखातीला अशा दोन गझला आम्ही पेश केल्या आणि मराठी गझल सम्राट श्री. सुरेश भट यांना त्या खूपच आवडल्या. त्यामुळे त्यांनी मला आणखी गझला ऐकवायला प्रेमपूर्वक आग्रह केला. अन् अशा रीतीनं आमची 'मैफल गझलांची' रंगायला लागली. निळी जांभळी रात चढू लागली. अन् आमची गझलांची रात रंगू लागली! आम्ही एक गझल म्हणायची अन् सुरेश भटांनी आपली गझला ऐकवण्याची प्रेमपूर्वक विनंती करायची. पहाटें ३ वाजेपर्यंत आमची अशी 'गझल-रजनी' रंगरंगली! ती सुरेल गोड आठवण तुमच्यासारख्या काव्यप्रेमी रसिक वाचक-श्रोत्यांना मुद्दाम सांगायचं कारण गझल-सम्राटाचीही दिलखुलास-दाद आमची– मैफल गझलांची!'–मिळवून गेलेली आहे. तीच नितांत नव शिखान्त रंग-रंगलेली- 'मैफल गझलांची!' आपल्या-सारख्या चोखंदळ रसिक वाचकांना सादर करतोय, अत्यंत अदबीनं पेश करतोय! मुलाहिजा फर्माइएगा–

महाशिवरात्रि,
दि. १६–२–१९८८

**इन्द्र पवार**

# अर्पण पत्रिका

आधुनिक मराठी कवितांची मैफल सजविणारे–रंगविणारे, तसंच माझ्या गझल लेखनाला व गझल गुंजनाला आकाशाइतुक्या दिलानं दिलखुलास दाद देणारे आमचे मित्र श्री. आबासाहेब देशपांडे 'आकाशानंद' यांच्या निर्मळ मैत्री अन् अभिजात रसिकतेला माझा हा रसीला–'मैफल गझलांची-' शीर्षक नजराणा सानंद अर्पण.

–इन्द्र पवार



# गझलांच्या मैफलीत...

गझलांच्या मैफलीत सुरंग भरतो आहे...
नवा शेर, पारिजात मस्तीत झरतो आहे! ।

मधुबाले, कां देशी... पेल्यांवर भर पेले?
कटु विष पिऊनि जगतो, दर दिन मरतो आहे

शबाब उसळते तुझे...उमलता अरुण गुलाब,
बघूनि मधु स्मित, गुलाब मनात झुरतो आहे

दाविता कां उद्याची रंगीत पहाट स्वप्नें?...
सकाळ डोळां काजळ अकाळ भरतो आहे

गझल् गुंजन गाऊनहि गझल् घुमे मनमंदिरीं...
मधु संगीत सरे परि, सरगम सुर तो आहे!

गझल् लेखन नसे खेळ, कठीण कलासाधना...
शेरांत बुडतां प्राण, शायर तरतो आहे!... ॥

# मैफलींत माझिया...

मैफलींत माझिया अजुनि गझल नवा बहार आहे,
सतारीच्या तारांमधुनि मृदुल नवा झंकार आहे ।

मुकुळ कळ्या–कळ्या मोकळ्या हसल्या
पाकळ्या पाकळ्या
रंगीत फुलबाग माझा सुगंधी गुलजार आहे ।

मधुबाले, तू ग पाजिले पेल्यांवरि भर पेले...
मम कविता...मधुशालेमधि बहार-फुलबहार आहे।

जगांत संसृतीचा जळे, रणरण उन्हाळा झळझळे-
गझल अनिललहरी झुळझुळ शीतल जळतुषार
आहे ।

मुक्तछंद नवकवितेचें पसरत आहे वाळवंट...
गझल मराठी कृष्णमातींत श्रावण हिर्वागार आहे!

# तांबडं फुटलं!...

तांबडं फुटलं, पहाटेची नव द्वाही कुठं आहे?
गरिबांस भाकरीची पण ग्वाही कुठं आहे? ।

'युनियन जॅक' उतरविला 'तिरंगा' नभि
मिरविला...
निवडणुकी झा या पण, लोकशाही कुठं आहे?

'व्होट' घेण्या 'नोट' द्या, विरोधीला चोप द्या
'स्वराज्या'संगं अभय 'स्वातंत्र्य'ही कुठं आहे?

ज्ञानदेव नामदेव, तुकोबा नि चोखोबा-
संत समलेखी विठ्ठल रखुमाई कुठं आहे?

सकल जनतेची पापनाशिनी मंदाकिनी-
मंत्री पापं धुणारी 'गंगाई' कुठं आहे?

स्वातंत्र्यास्तव फासावरती हासत जाती,
गाती-'हिंदू-मुस्लीम-सिख भाई' कुठं आहे?

सानथोर बाळांना भरवून करी भोजना-
समभावाची समता... तू आई कुठं आहे?...

# अंगडाई

पाहतो गुलाबकळ्या...हळुहळू उमलतांना...
परी सर ना तयांना...सखी अधर हसतांना! ।

सखी, लालचुटुक अधर...अलवार अनारकली,
फुटे ओठिं मुग्ध स्मित...दांत डाळिंब दाणा! ।

रंगती तरंगिणीत...चंचल तरंग तुषार...
दिसती बेरंग बघून तव नयन कटाक्षांना! ।

नको बघू अनूप रूप...सुंदरी, तू दर्पणीं-
लाजशील लजवंती, बघुनिया सम-सामना! ।

अंगांग तुझे झाले झगमग नितळ आइना,
नकोस उधळुं इंद्रधनु...अंगडाई घेतांना...! ॥

# एकला चालो रे !

नव जीवन मुशाफिरा, चल एकला...एकला !
चालता तू एकला... तुजसंग ये काफिला !... ।

परिसूनी तुझी साद देई ना कुणी प्रतिसाद,
वादळीं उजळी दीप... पावलं पुढती उचला ! ।

वाटेवरि ठायिं ठायिं... विखुरले कठिण कांटे,
चालतां होति कांटे... फुलसेज तुज कोमला ! ।

पदिं तरारले छाले... डोईवरि रणरण उन्हं,
उद्या उन्हाची होईल चांदरात सुशीतला !... ।

उन्हा-पावसाची तू मुळी न बाळगी तमा,
ध्येयधुंद युवा पहा... लालिमा पहाटेला !... ॥

# वेगळी माझी वाट !

गर्दीत माणसांच्या...मी...एकटा...एकटा...
वेगळी माझी वाट...अन् पुढति अमित वाटा ! ।

घन मानव-जंगलांत...दूर उभें एक झाड,
दुर्लक्षित रानफूल...परि सुगंध गोड मोठा ! ।

गांवाच्या शिवेवरति की मंदीर...एकलें...
पळती सडका शहरीं गांवाचा मम फाटा ! ।

झिलमिल शत चांदण्यांत...मी एक चमचम चंद्रम,
मिणमिणती फुलवाती अन् मी सूर्य दिवटा ! ।

सजति सिमेंट बंगले... नि मम घरकुल एकलें,
मम लहर ही वेगळी...नि उठति अनंत लाटा ! ॥

# काव्य जगून राहिलो!

चुकलं व्यवहारी गणित... काव्य जगून राहिलो,
कठोर कंटकिं गुलाब... धुंद उगून राहिलो! ।
मानवमनीं योजना... नियतीची ना कल्पना,
वादळांत दीपासम अजुन तगून राहिलो!
गंध-धुंद मधुवारे...कळ्याफुलें शशितारे...
जीवन चित्र रंगीं रंग रंगून राहिलो।
आलिंगी तरुवल्लरी...मधुप चुंबी मंजरी,
लाजरी उषा संध्या...रंग बघून राहिलो
आनंद चांदण्याला...मधु सुख सुगंधु आला,
निरागस नवजात शिशु...स्मित बघून राहिलो
जिणे बरबाद सगळें...अन् बेचिराख झाले,
मृत्युराखेंतहि 'स्फींक्स्' गत अन् धगधगून
राहिलो
इथें भंगती स्वप्नें... ओठात मिटे गाणे,
दर्दभरी गझल अजुन अन् गुण्‌गुणून राहिलो
दडती सुखदुख धागे...नि काळ पडद्यामागे–
लिहुंन 'इन्द्र' अमर गझल, समया ठगून राहिलो!॥

# प्रेम इतुकें लाभलें !

अनोळखी लोकांच्या मैफलींत मी आलो,
प्रेम इतुकें लाभलें...पाहुणा ना राहिलो!... ।

मला लागला इथला लळा प्रीतीचा बहुत...
रंगे नित मैफलीत... घराला मी विसरलो ।

दिलाचें मम पाखरू नील नभि मारी सूर...
घेइ वेध गगनाचा अवनीला अंतरलो ।

चुंबिला मी प्रेमानं झगमग बंकिम चंद्रम,
परि दाणा टिपण्याला परतूनि जगीं आलो ।

अरूपाचं सतत ध्यान लागे वेड जिवाला,
तुझ्या रूपानं अरूप...सौंदर्य पाहून आलो ।

परम ज्योतीपासूनि झाली वेगळी ज्योत...
मिळतां ज्योतीस ज्योत... प्रकाश रूपें उरलो ।

जुळल्या तुझ्या नि माझ्या जिवाच्या तरल तारा,
जमतां मधूर सरगम...गझल गाऊनि गेलो ! ॥

# रंग माझा आगळा!

नकली नाण्यांना जगिं आज बहु भाव आहे,
काल होता जो चोर, तो आज साव आहे ! ।

बदलत्या कॅलेंडरागत नित नित बदलती निष्ठा-
'पार्टी बॉस' समोरी... निष्ठेचा आव आहे!

राजनीति बदली नित शय्या सोबती वेश्या-
बाई मी भोळी अन् टग्यांचा गाव आहे !

मतांकरिता घासल्या अमुच्या उंबरिं चपला-
कालचा रंक सेवक, अजि बडे राव आहे !

तान्हुल्या वत्सा सोडुनि गरिब गावली गेली ...
कसायांनी गोमांस केले लिलाव आहे !...

दिव्य अग्नि परीक्षे मधि सती सीता उतरली...
राम वनिं धाडण्याचा अजि कुटिल डाव आहे

मराठी गझलेमधीं रंग माझा आगळा...
अश्वमेध घोडदौड नि काक-काव्काव् आहे ! ॥

# विद्रोही गझल

ती स्वतंत्रता खरी नाही,
जिथं पोटांस भाकरी नाही ! ।

युवांनो, खुल्या तुम्हा दश दिशा-
शिकलेल्यांना नोकरी नाही !...

देवदूता, वसव नभनगरी–
इथे छत डोईवरी नाही

वाहतील इथे दूधगंगा...
(हाय) गरिबांघरी घागरी नाही !

विकत घेइ मम कलम विद्रोही-
कुणाचीही बांसरी नाही !...

स्वर्ग तुझा काय जाळायचा–
जिथे कविता...भाकरी नाही ! ॥

## वनवास

झाला सुरू आता मम कठिण वनवास आहे,
आसपास जनसागर... तरि विजनवास आहे।
काल जिथं हिरवीगार छायाघन गर्द झाडी-
उगले तिथं सिमेंटचे जंगल... विकास आहे! ।
सुहास्य मुख, बुट सूट टाय... परीट घडीचा-
आंग्ल विद्या भूषित सभ्य... निघत बदमाश आहे ।
भरल्या संसारांतुनि... गेलीस तू निघोनी-
उषारंगी तू हससि, काय मम भास आहे?... ।
पाखरू जाई उडुनी... ठेवुनि शत आठवणी...
दूर जरि प्रिय, उरिं स्मृती-प्रिय आसपास
आहे ।

तुझिया श्वासे हलती... पानफुलें... तरुवेली...
हसता कळ्या पाकळ्या... तें तव सुहास आहे! ।
वेदना, कुंठा, दर्द... एकलेपण, विफलता-
कविविना जाति कुठं, त्या लागे मम वास आहे!।
कशास होशि निराश, अन् मनोमनीं उन्मनी?
पानगळनंतर निकट येत मधुमास आहे!...॥

# गझल... आजची

सख्या रे, करू नकोस उद्याचा तू वायदा...
करि आज नगद सौदा...उद्या काय फायदा? ।

उद्याला मेल्यावरति स्वर्गी सुरा अप्सरा-
नयन मिटता स्वर्गाचा मजला काय फायदा? ।

उद्या मृदुल फुलपाखरं...दिसतील सपनं गुलाबी,
उद्या पाहिला कोणी, आज कौमुदी सुखदा! ।

हसत येत उषा गगनीं उद्या पाहिला कोणी,
उद्या सुखाची पहाट... करू नकोस वायदा! ।

उद्या सूर्य स्वर्णगोळा गोठुनी कंच काळा,
आज करी तव सतार... बोले दिडदा दिडदा! ।

माणसांच्या जंगलीं... माणूस शोधतो मी...
प्रीती नुरता चाले जंगलाचा कायदा! ॥

# दर्दील्या मम गझलांत

दर्दील्या मम गझलांत माझें जीवन आहे,
हसऱ्या वसंतबहरों भिजला सावन आहे ! ।

शद्व–शद्व जसा चिरा...
बांधी कलामंदिरा,
गझल कविता देवीचं
पूजा साधन आहे !...दर्दील्या ... ।

काव्यांत रथी कितीक–
भागीरथ महारथी,
मम गझल गंगा सहज...
सुंदर पावन आहे !...दर्दील्या ...।

गझल दरबारी वामा...
काव्य मैफलींत शमा ।
गझल कविदर्द–व्यंजन,
जनमन रंजन आहे !...दर्दील्या ...।

गीतांत कवि वेदना...
सांधी फाटल्या मना,

दर्दभरी गझल खरी–
शायरी जान आहे ! दर्दील्या ॥

छेडिली वीणा माझी...तव मनिं तरंग उठती...
वधू-वर सूर जुळता...मधु मन मीलन आहे !
दर्दील्या... ॥

## या जीवन संघर्षात-

या जीवन संघर्षात...मानली ना हार मी,
पाहिली कधि पानगळ, कधि वसंतबहार मी ! ।

पाठ दावणाऱ्याचा नित वार उरिं झेलला,
परि कमरेखाली कधि केला नसे वार मी !...

हे जीवनयुद्ध मला...शुद्ध 'जिहाद' जाहले...
धर्मयुद्ध खेळुनि घे... 'शहीद' अलंकार मी !...
शरीरिं जखमा अनंत...नखशिख न्हालो
रक्तांत...
घाल हळुच अता कफन...निजलो हळूवार मी !...

ऐकी, सुरलोकीं हर जखमेला मिळे अप्सरा-
बघुनि मम जख्मा, संपवि कवि 'इन्द्र' दरबार
मी ! ॥

# आंसू तू नयनांतले...

आंसू तू नयनांतले...
नयनांत राहू दे,
दुखदर्द अन् मनांतले
मनांऽत राहू दे !।

चल जीवन पायवाट...
घेई उचलुन कंटक,
सुगंधी गुलाब कळ्या...
जगास तू घेऊ दे !...

घेई तू शिरावरी...
हसून ऊन पाऊस-
शीतळ मधु चांदण्यांत...
जगास तू न्हाऊ दे !...

आंसू पददलितांचे
घेई सांठवुनि नयनीं...
हासू मधु अधरींचे
अन् जनांस देऊ दे !...

आलास तू दुनियेत...
        करित निरागस रोदन,
परि घेतांना निरोप...
        हसत हसत जाऊ दे !... ॥

## गझल कळी

माझ्या मनिं गझल कळी हळुच उमलून यावी,
गाता दर्दभरा शेर...ओळ उचलून घ्यावी !... ।

उमलत्या नव कळीला...असोशी गंधवेणा-
सुगंध लहरी अंतरिं मधु दर्वळून जावी !...

ये गुलबदन प्रेमिका...झुळझुळ सकाळ झुळका...
तू हसता रंगबहर उषा उधळून जावी !...

भ्रष्ट हो धनिक शासक बघुन रुपेरी चंद्रम-
बघुन भ्रष्ट जन जनता- कालि खवळून जावी !

ऐकूनि गझल माझी देई दिलखुलास दाद-
एक लहर इकडुन, अन्य लहर तिकडून
        यावी ! ॥

# अजून प्रवास किती?...

आलो इथं तुझ्यामुळे घरीं मुक्कामास किती,
नियती, उरला अजून जीवनप्रवास किती?...।
सागरतीरीं सुरेख बांधिले रेत इमले...
उठल्या लहरी लाटा... वाहति सदनांस किती!
दिले मज तनमन प्राण... शतरंगी उषा-स्वप्नें
स्वप्नभंग नित जाळी... सकंवार जिवास किती!
आंखल्या मनिं योजना, येइ हातीं वंचना–
अकल्पित मृत्यू कसतो कुलिशकठिण पाश
किती!

छळी मृत्यु जीवित जिवा, छळी जीवन मानवा...
सुख मोहरी, दुःख गिरि, करि दर्द निराश किती!
अजुन अर्धमिटली कळी, खुलली नसे पाकळी...
मुकुळ कळी जाइ बळी, होइ मन उदास किती!
कृष्ण घना, तव राधा- धरेचि अनंत तृष्णा...
देशि तू दो थेम्बुली... मनीं अमिट प्यास किती!
अत्ता करी कृपा वर्षा, पार नुरो दिव्य हर्षा...
मम अंतर्मनिं निशिदिनिं, लागे तव ध्यास किती!

# माझा संग्राम

जीवन प्रवासांत मज तुझे प्रिय शहर आहे–
मुक्कामास थांबे, परि मानसीं सफर आहे ! ।

केला हसत जगाशी मुकाबला, परी अता–
माझे माझ्याच संग... दिनरात समर आहे !

रंगीन जीवनावरि जडली माझी प्रीती–
कळी-पाकळी हुंगे... चलचपल भ्रमर आहे !

लोकशाहीमधि लोक बिनताज राज करिती-
तव शिरीं नभाचं छत्र... तरूवर चमर आहे!

नाट्यगीत भावगीत-गायक कितीक गाती,
लिहुनी गझल मराठी कवि 'इन्द्र' अमर आहे!॥

# दलित गझल

वाहिली आजवरी खांद्यांवरी पालखी...
दलित अम्ही झुगारतो आज तुमची मालकी! ।

बेहोषीनं मिरविला नांवे तुमच्या झेंडा,
तरि राहिली रिकामी भाकरीची डालकी!

म्हणतां भाऊ भाऊ, तुम्ही पळविता खाऊ...
मम सेवा तव मेवा, कळली भोंदू भावकी!

लावली नसे ममता, येईल कशी समता?
अब तो तुम जय बोलो- चोर की औ'सावकी!

सवर्ण दलित माजला... संघर्ष गांविं पेटला,
झोपडीसंग जळाली अमानुष माणूसकी!...

जाहलो अम्ही जागे... करितो विद्यासाधना,
गांव तुमचे सोडिले... लखलाभ हो गावकी! ॥

# मम हातीं मशाल आहै!

विहरे नभि विहगापरि, ग्रहांचि धमाल आहे-
राहिना इथे मनु परि... मनुजा, कमाल आहे! ...।

देऊनि आश्वासनें, बळकावली आसनें-
स्वप्नभंग होता मम हातीं मशाल आहे ! ...

फोडुनि विदेशी कोष, आणी गझला लेणी...
माल धन्याचा वाही कविवर हमाल आहे !

कवि, सहृदय रसिकांचा सहज संवाद व्हावा...।
हवा कशास समीक्षक मधला दलाल आहे ?...

कवि-कलावंतांचा होईल सत्कार कसा ?...
सत्कारास धन तुमचं श्रीफल नि शाल आहे !

अता निवारा वर्षा, नुरेल अपार हर्षा...
धरणी तव घर... छप्पर अम्बर विशाल आहे !।

# ज्वालामुखी

ज्वालामुखी वरूनी अति शांत झोपलेला...
लोक आज आंतूनी अंगार पेटलेला !... ।
जो तो सांगतो अम्हा- 'मी घरंदाज नेता'
पूर्व चरित्रा पाहता... निघे तो बाटलेला!
भ्रष्टाचारावरती मम नेता मूग गिळी...
चिखलात दिसे तो ही आकंठ बूडलेला
गायिली जगतीं कुणी, विद्रोहाची गाणीं,
झाला कर कलम सदा, मधुकंठ काटलेला ।
जयांना नवयुगाची दिसली पहाट स्वप्नें
वेडा कवी शहाणा ठरतो झपाटलेला !
कलावंत मस्त गाई... गीत अमृत गोडाई ...
मानधना देतांना...खिसा कां फाटलेला?... ॥

# वेदनेचे वेद !...

झरत्या अश्रुंनी मी दुखभरे गान केले...
बघण्या उषा...रातभर...जिवाचे रान केले !

निळे निळे तव डोळे...गीत गोड गाणारे,
तिरछी लाजरी नजर...मदनानं बाण केले !

कोंवळा बोल तूझा...अमृतांत नहालेला,
तुला ऐकण्याला मी... जिवाचे कान केले !

दो घडीच्या सुखाला करिं धरिला मधुप्याला
दो मधु थेंबांसाठी...विषाचे पान केले !...

मम गझल वेदनेची...पुकार आर्त दिलाची...
वेदनेचे वेद मी...जगाला दान केले !

दुख पुसाया जन येति, दर्द वाढवुनि जाती-
धन्वंतरि, दुख अंतरि...उपचार छान केले !

येइ मम जीवेनि गझल, होइ कुटी राजमहल
मम गझलेनं कवीला अमर वरदान केले ! ॥

# आंसवांचे गीत !...

विश्वासानं उरिं ज्यांच्या ठेविली मान आहे,
काटला गळा त्यांनीच...घेतली जान आहे ! ...।
सरकला अंतरपाट...सारीपाट मांडला-
अनुकूल तव डाव, मज...प्रतिकूल दान आहे ! ।
दीन घडी हसण्याची सजा मिळाली मोठी-
दिन रात आंसवांचे नयनांत गान आहे ! ।
सहकार जनतंत्रात...जाहला स्वाहाकार-
नेत्यांस चरण्या हरित मोकळे रान आहे ! ।
माजला बहु गलबला...दर्दील्या मम गझला,
तृषार्त अंतरींची शोकार्त तान आहे ! ।
संत ओवी नि अभंग...शाहिर लावणी रंग,
माझी गझल मराठी नव काव्य शान आहे ! ।
काव्य वसंत मधुवनीं गझल फुलं येति फुलुनी,
माय शारदा चरणीं...मम अर्घ्यदान आहे ! ॥

# माझी गझल मराठी

गझल लिहण्याची काय अम्हास चोरी आहे ?
गझलेवर हक तुझाच...ही शिरजोरी आहे ! ।
गर्जन करी शार्दूल...जंगल सकल गुंजते-
चपल वानरांची इथं बडी मुजोरी आहे ! ।
झाकी वृद्धा कोंबडा...सूर्य उगवे तांबडा-
दिनकर हसतां अंबर...सूर्य फुलोरी आहे ! ।
हजार रश्मीला का...हरविती कधि काजवे?...
मम गझल मधुफल...तुझी शिळी शिदोरी आहे ।
फोडली तू तिजोरी...वेंच कलदार नाणीं-
मम गझल मराठी...तव...उर्दू 'छोरी' आहे ।
शास्त्रीय तुझें गायन...लखलाभ तुला राहो-
माझी गझल मराठी...'ठुमरी, होरी' आहे ! ।
जगण्याची इथं सक्ती...मरण्याचीही सक्ती,
हुकुमशहा हसण्याची...झाली चोरी आहे ! ।
अन्यायविरोधी झुंज...माय बाप, न्याय करा
भरे लोकन्यायालय...रसिक समोरी आहे !॥

# मैफल गझलांची !

मैफल मम गझलांची...उंच भरारी आहे,
छेडी मी मधुवीणा...उरीं उभारी आहे !' ।
उरींची मम स्पंदनें, उठे तव मनि कंपनें...
छेडितां वीणा,रसिक-मनीं थरारी आहे !... ।
लावी तू एक दीप, उजळे लाख दिवाळी...
अमेच्या घन अंधारिं लख्ख उजारी आहे ! ।
तू-मी मिळुनी गाइलं अमृतमय जीवन गीत-
उषा-प्रीत सूर्यफूल...अरुण फुलारी आहे ! ।
समरीं उभ्या ठाकल्या अमित कौरवी सेना-
मज भय ना काळाचे, सखा मुरारी आहे ! ।
गेलीस तू सोडूनि, विरहवेदना सोडिना...
मनमंदिरीं निशिदिनीं...जळे अग्यारी आहे ! ॥

## अवतार

चाले तलवार बंदूक...वाहत रुधिर धार आहे,
दोन मनांचं मधुर मीलन...जगात अमर प्यार
आहे !... ।

विविध वाद्ययंत्रांचा हो, बहु शोर जगिं वाद्यवृंदी-
तुझ्या त्या एकतारीला परि आतड्याची तार
आहे !

कवळ्या मुकुळकळ्या हसल्या वसंतवनिं सुगंध
देती-
हाय खंत, मुक्या कळ्यांची...न पाहिली बहार
आहे !...

सांडलं लाल रक्त ज्यांनी रचिला न इतिहास
त्यांनी
इतिहास त्यांचा, वार कट्यां दिधलं निर्मळ
प्यार आहे !

कवि-कलावंत विष पिऊनि देती अमृतदान
लोकां-
नीलकंठ शिवशंभूचा कवि नवा अवतार आहे! ॥

## सफर

दोन दिवस मुक्काम इथं...पुन्हा नवी सफर असे,
रातभर वसती, उद्या...नव गांवीं शिबिर असे! ।

मुशाफर मी कलंदर...
आज इथे, उद्या तिथे-
सारी दुनिया प्यारी
रोज नवे शहर असे !...दोन दिवस ।

एके ठायिं राहिना...
मनिचा 'जिप्सी' राजा-
विविध सुमरस लुटे, मन...
हें चंचल भ्रमर असे !...दोन दिवस... ।

उन्हात चालुनि दमलो...
सावलीला थांबलो;
नव्या वाटचालीस्तव
कसली हो कमर असे !...दोन दिवस ।

न्याहाळिलें जगाचे
रूप रंग गंध नवे,
मनांत मम चिर वसंत-
रंग गंध बहर असे !...दोन दिवस ।

दोन सुगंधी गुलाब हसले, खुलले, गळले...
दोन मन मीलन मधुर...प्यार जगीं अमर असे!...
दोन दिवस... ॥

## झुंज

दलितांस्तव करूणेची आग मनांत वसूं दे,
अन्याय विरोधी झुंज...राग जनांत असूं दे !...।
नेता खुर्चीसाठी...खंजीर खुप्से पाठीं-
चोरांपासुन सावध...जाग तमांत असूं दे !
जुलूमी अन्यायांची जरी हो परमावधी-
अवतरे श्याम, 'काली नाग' जळांत असूं दे !
महापुरुष करिती...कधी कधी हो गलती-
शोभावर्धक काळा...डाग शशींत असूं दे!
सकल-नाशकारी अन् निघती आयुधं भारी...
विनाशांतूनि विकास-माग जगास दिसूं दे !
कविता कला...सर्जना-ज्योती मंद होइना-
घन तमांत मधुर 'दीप-राग' गळ्यांत असूं दे!"।

# प्रीती

तुझी नि माझी प्रीती...तुजला कळली नाही;
कधि कधि प्रीती कळली, परंतु वळली नाही !...।

दाटली चोळी तंग,
अंगांगि रंग अनंग...
शुभ्र मोती जवानी
अजुनी मळली नाही !...तुझी नि माझी...।

घडता अचानक भेट,
मनिं सूर्यफूल हसे...
तुझ्यावरुनि सूर्यपिया,
नजरहि ढळली नाही !...तुझी नि माझी...।

माझिया खिडकीमधुनि
पडे तुजवरी कवडसे...
सखया मदनानं चळले
तव मति चळली नाही !...तुझी नि माझी...।

जागेपणीं पाहिली...
  मधुमीलन सपनाली,
मधुमीलन आसप्यास...
  पुरती शमली नाही ! ...तुझी नि माझी...
निपट एकली शयनीं-
  रातिं तारे मोजुनी
जागरणीं चांदरात-
  तुजला छळली नाही ! ...तुझी नि माझी...
आलें कुंतलिं माळुनि गुलाब लाल सुगंधी...
मौनाची मम बोली तुजला कळली नाही !...
तुझी नि माझी...

# गझल गाऊन जाऊ!...

आलो इथं मैफलीत...गझल गाऊन जाऊ...
रसिका, वीणातारा...मृदुल छेडून जाऊ!
आलों आम्ही म्हणून नवरंग मैफलीला-
या बेरंग दुनियेत...रंग उधळून जाऊ!
नील नभीं अरुण उषा...वाढे मुक्तीत तृषा,
गीत गझल नव धारा-मधु बरसवून जाऊ!
संघर्ष, द्देषामुळे...जग विशाल वाळवंट-
त्यामधि हिरवळ हिरवीगार लावून जाऊ!
जगीं वादळी वारे, कानीं कर्कश नारे,
जीवन संगीत गीत मधुर गाऊन जाऊ!
कोमेजति कळ्याफुलें, हिमगार शिशिरामुळें,
नव वसंत-रंग गंध...रस बरसवून जाऊ!
माणूस आज पिळतो, पददलित माणसांना,
माणसीं माणूसकी-ज्योत उजळून जाऊ ... ॥

## गझल एकलेपणाची

प्रिय गेला जरी दूर, परि निकट वास आहे;
दूरदेशी जाशि तरि, जवळ तव श्वास आहे! ।
रवि नभीं जाळीं कमळण, जो आवडतो ज्याला-
दूर असूनहि प्रीतम दिलाच्या पास आहे
विसरलास तू मजाला, पाहि नयन वाटेला...
लागला मला तुझाच निरंतर ध्यास आहे
मिळली नित दोन मनें, पाहिली जागी स्वप्नें...
तुझें मधु मधुर मीलन काय मम भास आहे? ...
नील नभि शुक्रतारा, शीतल पहाट वारा...
उमलत्या कळ्या फुलांत तुझाच सुवास आहे!
या एकलेपणीही-नाहीस एकली तू...
सांगेल तुला सुगंध मी आसपास आहे!...
साकी, दे फुल पेले अन्यांस, मज दो थेम्बू ...
अनंत माझी आशा अन् अमिट प्यास आहे!
मानव जीवन नाही वाटचाल तिमिराची-
मरूनहि अमर, ज्याचा आठव प्रकाश आहे!
जिणें जाइ प्रगतिकडे, तमांतुन ज्योतीकडे-
मानवजीवन निशिदिन अखंड प्रवास आहे!... ।।

# उद्याची चिंता करूं कशाला ?

आजची घडी मजला प्यारी,
उद्याची चिंता करू कशाला?
गुलाबी उषा मजला प्यारी,
संध्याछाया स्मरू कशाला?...।

शायर अवनी-अम्बर सेतू,
जगिं उन्हाळीं हसे मधुऋतू-
हसऱ्या जीवन वसंतामधी,
आंसवांसंग झरू कशाला?

धन-दौलतीनं आहे फकीर,
मी नवकवि कुबेर कल्पनांचा
लघु दिलाच्या चिकू दात्यांपुढं,
अमीर झोळी धरू कशाला?

शापाने नियतीच्या माझे
मधुर सपनमंदीर भंगले...
माझा मी नुरलो, चिरला गेलो,
दुजं दिल चिरू कशाला?

चाललो आम्ही ज्या ज्या वाटें...
फुलें कमी कांटे अन् कांटे,
दिले जगाला फुलें सुगंध...
पथि नव कांटे भरू कशाला?

दिल्या जगाला सत्ता सम्पदा,
मजला दिधलें दर्द आगळे–
अंगणांत मम काव्य कल्पतरू,
लावू हिरवा 'सुरु' कशाला?...॥

# मधु गझल-बोलु राहू दे!

मशीन-शोर भरल्या जगीं
मधु गझल-बोलु राहू दे,
सुवासिनी धरणी-अंगीं......
हिरवळी-शालु राहू दे! ।
युद्धखोरांनो, शिलगविता जंग-आगि अंबर अवनी-
शिरिं मनूच्या शांतिशीतळ आभाळ भाळु राहू दे
नव्या पिढीच्या कुंठेने जन्मते वैफल्य अनास्था,
सुंदरतादेवीचरणीं... फूल सुकोमलु वाहू दे!...
चंचल विदेशी रंगांत रंगूनि बेताल जीवन,
नवयुवांच्या नवजीवनीं संगीत तालु राहू दें!
धनिकांनो, लखलाभ तुम्हा शशितारें,
गजान्तलक्ष्मी–
किसान शिवारिं सुगी, बाळं, तरुवेलु,
शालु राहू दे
युद्धखोरांनो, नभा भिडे 'तारायुद्ध' संघर्ष-स्पर्धा,
गगनाच्या गळिं दूधधवल कबूतर-माळु राहू दे!
अणुयुद्धामुळे बेचिराख...महान स्मशान हो धरती
नर्तक शंकर चरणिं मधुर रुणुझुणू चाळु वाजू दे! ॥

## निरोप

निघे मी प्रवासाला...ओठिं मम नांव आहे,
जिथं वाढलो मी, परकं...झालं मम गांव आहे! ।

गळ्यांत मम घालाया हार लागली स्पर्धा–
हारांत हार द्याया अति धूर्त डाव आहे!

ठेविले जयांनी मम घरावरती निखारे–
आग विझविण्या तेची चोर बहुं साव आहे!

देती मज हारतुरे, परि फुलांत छुपे सुरे...
त्या क्रूर गारद्यांचा भलताच डाव आहे!

वादळांतूनि काढुनि बांधी नाव किनारीं–
तुफान सागरिं लोटलि पुन्हा मम नाव आहे!

या जगाच्या हाटांत नित वाढतीं किंमती,
माणुसकीचा घटतो दररोज भाव आहे! ॥

# शेवट एक विराणी आहे !...

मानवा, जन्म तव श्रीगणेश...
मरण अर्धी कहाणी आहे;
पुष्प उमलले, हसले, गळले,
सुफळ रसाळ जवानी आहे !
मानव जीवन सुमन सुगंधी,
दरिया दर्दभरी ही दुनिया–
समयाच्या वाळूवरी गझल
अमुची अमिट निशाणी आहे !
दर्द मजला इतुके लाभले,
दिल माझं कांठोकांठ भरले...
एका डोळ्यांत हसू उमले,
दुज्या डोळ्यात पाणी आहे !
मरणानंतर मानवा,
तुझे पांच सोबती जाती कोठें ?
थरथरती पानगळीनंतर
हसत वसंत उद्यानी आहे!
नव्या युगाचे स्वप्न उद्याचे...

रंगीन पाहती कलावंत–
वदती, कवि कलावंत वेडे...
दुनिया दीड शहाणी आहे!
आंसूमोती मनांत प्यावे,
हासूमोती जनांत द्यावे...
दर्दभरी मानवी जिंदगी,
शेवट एक विराणी आहे! ॥

# चिरायु हो स्वतंत्रता !...

माझा भारत प्यारा...भूवरि नंदन आहे,
मुक्तीस्तव हो शहीद...पावन वंदन आहे!...।

विशाल जगतीं असती सुंदर देश विदेशीं-
परि भारतमातेचा कणकण चंदन आहे !

कुठं असे नगराज शुचि...गोदा गंगा यमुना,
विमल धवल गंगाजल...अमृतमंथन आहे !

जन्मलो आम्ही भारतीं, अभिमान सार्थ त्याचा
या मातीचं शुभ नातं...युगयुग-बंधन आहे !

आझादी-बलिवेदी...देशभक्त दे आहुती-
अजून मुक्तीचं अर्ध अन् रणकंदन आहे!

विघटन अन् फूट लूट भ्रष्टाचार संपवा-
लाखो दीन लोचनीं...आंसू-स्फुंदन आहे!

देऊनि नित बलिदान...स्वतंत्र भारतमाता-
मुक्ती ठेव अनिर्बंध...शहीद-बंधन आहे!

भारतशत्रूंच्या इथं बांधू आम्ही कबरी...
देशभक्तीचं भारत-हृदयीं स्पंदन आहे !

स्वतंत्र भारत प्यारा...जगतीं झगमग तारा
देशभक्तियुक्त गझल...जनमनरंजन आहे!

चिरायु हो स्वतंत्रता...जय हो भारतमाता-
जनगण अधिनायक...मंजुळ गुंजन आहे!



## आभार !

माननीय विद्वान समीक्षकांचे व कविमित्रांचे आम्ही आभारी आहोत.

- श्री. आकाशानंद
- श्री. सुरेश भट
- प्रा. वसंत कुंभोजकर
- श्री. उत्तम कोळगांवकर
- प्रा. पुरुषोत्तम पाटील
- श्री. ज्ञानेश मोरे
- प्रा. नारायण शिरसाळे
- श्री. भगवान भटकर
- डॉ. यु. म. पठाण
- प्रा. चन्द्रकान्त पाटील
- श्री. पं. बं. शेळके आणि
- नाथ मुद्रणालयाचे सर्व कर्मचारी
- चित्रकार प्रकाशचंद्र
- प्रा. साळुंखे.

REFBK-0026258
REFBK-0026258